मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
» पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.
» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

पालघर - ठाणे-रायगड - रत्नागिरी
RNI No.: MAHAMAR/2014/62313 » मंगळवार, २२ जुलै २०२५ » वर्ष: ११ » अंक: २४२ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## ऑपरेशन सिंदूरवर २५, तर आयकर विधेयकावर १२ तास चर्चा होणार

**नवी दिल्ली, दि.२१ प्रतिनिधी**

पुढील आठवड्यात संसदेत ऑपरेशन सिंदूरवर चर्चा होईल. लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवर १६ तास, तर राज्यसभेत ९ तास चर्चा होईल. याशिवाय, लोकसभेत आयकर विधेयक २०२५ वर १२ तास चर्चा होईल. तर, इंडियन पोस्ट विधेयकावर ३ तास चर्चा होईल. याशिवाय, राष्ट्रीय क्रीडा विधेयकावर ८ तास आणि मणिपूर बजेटवर २ तास चर्चा होईल. दरम्यान, टीडीपी आणीबाणीवर चर्चेची मागणी करत आहे. तर, भाजप नेते अनुराग ठाकूर यांनी हिमाचलमधील पाऊस आणि पुरावर चर्चा करण्याची मागणी केली आहे.

अग्रलेख

# खरीखरी

## नाही म्हणणे शिकलो

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी भारताचा पदोपदी अपमान करण्यासाठी जराही कसर ठेवली नाही. किमान दोन डझन वेळा भारत आणि पाकिस्तानचे युद्ध आपणच थांबवले, असे सांगून भारताला डिवचण्याचा प्रयत्न त्यांनी वारंवार केला. आतापर्यंत भारताकडून याबाबतीत कुठलीच प्रतिक्रिया आली नव्हती पण आता युरोपीय राष्ट्रे, अमेरिका आणि नाटो या सर्वांनी मिळून आपल्याला धमकावणे सुरू केलेले आहे. रशियाकडून क्रूड ऑइल खरेदी करू नका, अन्यथा तुमच्यावर जबर आयात शुल्क लागू केले जाईल अशी धमकी देण्यासही हे तथाकथित बडे नेते मागेपुढे पहात नव्हते. शेवटी आपल्या भारताचा सन्मान आणि हितासाठी या कंपूच्या दादागिरी विरुद्ध भारताने भूमिका घेतलेली आहे. हे कधीतरी होणे अपेक्षित होतेच मात्र, यापूर्वी आपण गप्प राहिलो पण अजूनही आपण गप्प राहिलो असतो. तर भारताला या युरोपियन कंपूने फार मोठ्या खड्डयात ढकलले असते. आताही भारताने घेतलेली भूमिका या मंडळींना पचणार नाही कारण अमेरिकेकडून महाग दराने तूरडाळ खरेदी करा त्यांच्या अन्नधान्याला भारतात प्रवेश द्या, असे दादागिरीचे प्रयोग हल्ली सातत्याने सुरू होते. रशियाकडून क्रूड ऑइल खरेदी करून त्याचे शुद्धीकरण करण्याचे दोन मोठे प्रकल्प भारतात आहेत, त्यापैकी नायारा ही एक मोठी कंपनी हे काम करीत होती. त्या कंपनीला युरोपियन देशात आता प्रवेश नाही. तेवढ्याच तोलामोलाची कंपनी रिलायन्सचीही आहे, काही दिवसानंतर रिलायन्सवरही ही गाज पडू शकते. आता अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रे यांच्याविरुद्ध भारताने सरळसरळ भूमिका घेतलेली आहे. या युरोपीयन युनियन मध्ये इंग्लंडचा समावेश नाही. आता इंग्लंड बरोबर व्यापारी करार होतो की नाही किंवा झाल्यास तो भारतानुकूल असेलच याची शाश्वती नाही. दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडचा पुढाकार होता त्यावेळी अमेरिका आणि इंग्लंड आणि इतर पाश्चिमात्य राष्ट्रांनी हिटलरचा पराभव केला होता. आता इंग्लंडशी आपले संबंध कसे राहतात हे पंतप्रधान मोदी यांच्या दौऱ्यानंतरच कळेल. मग आता भारताजवळ पर्याय कोणता आहे, तर भारताला रशिया आणि चीन यांच्याशी जमवून घ्यावे लागेल. रशिया हा आपला जुना आणि पारंपारिक मित्र आहे पण चीन हा भारताचा मित्र असूच शकत नाही. धोका देण्याच्या बाबतीत चीन हा नामचीन आहे. याच चीनने भारताच्या सर्व शेजारी राष्ट्रांना मोठ्या प्रमाणावर कर्जे देऊन भारताविरुद्ध युद्धच पुकारलेले आहे हे उघड सत्य आहे. याचा अर्थ असा आहे की, भारताला जेवढा धोका अमेरिका आणि त्यांच्या बगल बच्चांकडून आहे तेवढाच किंवा त्यापेक्षा जास्त धोका चीनकडून सुद्धा आहे. म्हणजे आता अमेरिकेसोबत आपला करार झाला नाही कारण डोनाल्ड ट्रम्प म्हणतील तसा करार करण्यासाठी आपण तयार नाही. तर त्यामुळे जागतिक व्यापारात भारतासमोर यापुढे मोठे संकट उभे राहू शकते. जगातील सर्वात मोठी लोकसंख्या असलेल्या भारताला ही मंडळी डावलू शकणार नाहीत हेही तितकेच खरे आहे. तरीही आज भारताला नवे मित्र जोडण्याची गरज आहे. ही गोष्ट सुद्धा सत्य आहे की रशिया आपला जुन्या काळापासूनचा मित्र आहे. इराण सुद्धा आपला मित्र होता परंतु आपल्या डळमळीत परराष्ट्रीय धोरणामुळे अनेक मित्र दुरावलेले आहेत. त्यातच सध्याची ट्रम्पची दादागिरी बघून युरोपियन राष्ट्रेही भारताला छेडू शकतात कारण अशा अनेक बाबी आहेत कि, ज्या आपल्याला आयात केल्याशिवाय गत्यंतर नाही. साधी रासायनिक खतांची गोष्ट घेतली तरी डीएपी आणि युरिया या दोन रासायनिक खतांची निर्यात चीनने भारतासाठी जवळजवळ बंदच करून टाकलेली आहे. युरियाच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांना भयानक त्रास सोसावा लागत आहे त्यासाठी मोठमोठ्या रांगा लागलेल्या दिसतात. भारतातील इलेक्ट्रिक वाहनांना चीनकडून काही गोष्टी खरेदी कराव्या लागतात, त्यामध्ये लिथियम बॅटरी आणि त्यातील धातू ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. त्यावर सुद्धा चीन बंदी आणू शकतो म्हणजे हा उद्योगही रसातळाला जाऊ शकतो. २०१४ पूर्वी भारत आणि चीन जवळ जवळ बरोबरीत होते मात्र, गेल्या दहा-बारा वर्षांमध्ये चीनने योजनाबद्ध रीतीने अतिप्रचंड प्रगती केलेली आहे. याचे परिणाम पुढील काळात आपल्याला भोगावे लागू शकतात कारण गहू आणि तांदूळ यामध्ये आपण स्वयंपूर्ण आहोत. पण आपले दर एकरी उत्पादन चीनपेक्षा ५० टक्क्याहून कमी आहे त्यामुळे आपल्याला यापुढे अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. आता यातून मार्ग काढणे हेच आता सरकारचे मोठे काम ठरणार आहे. पण एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची झालेली आहे आणि ती म्हणजे अमेरिकेला हवा तसा करार करण्यास आपण नकार दिलेला आहे. भारताच्या इतिहासातील अत्यंत कठीण प्रसंगात किंवा कठीण काळात सध्या आपण वावरत आहोत. आज सकाळी पत्रकारांसोबत बोलताना मोदीजींनी विरोधी पक्षांना सहकार्याचे आवाहन केलेले आहे, ते सहकार्य दोन्ही बाजूंकडून सद्भावना असली तर आणि तरच शक्य आहे. एकूणच सध्याची परिस्थिती गोंधळाची आहे हे आपण मान्य केले पाहिजे. त्यातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला एकीची वज्रमूठ करावी लागेल आणि त्यासाठी सरकारलाच पुढाकार घ्यावा लागेल. ही काळ्या दगडावरची रेष आहे, हे कोणीही विसरू नये.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# लोकल स्फोटांमधील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

**मुंबई, दि. २१ प्रतिनिधी**

**मुंबईत ११ जुलै २००६ रोजी झालेल्या लोकल ट्रेन स्फोटांमध्ये १८० हून अधिक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला. त्यानंतर तब्बल १९ वर्षांनी आज मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणातील सर्व १२ आरोपींना निर्दोष मुक्त केले. न्यायालयाने म्हटले की, सरकारी पक्ष या प्रकरणात आरोपींविरुद्ध दोष निश्चित करण्यात पूर्णपणे अपयशी ठरला आणि "त्यांनीच हे गुन्हे केले, हे पटण्यासारखे नाही." या निकालामुळे महाराष्ट्र अँटी टेररिझम स्क्वॉड (एटीएस)ची मोठी अडचण झाली आहे, कारण तपास एटीएसकडून करण्यात आला होता.**

न्यायमूर्ती अनिल कीलोर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या विशेष खंडपीठाने निकाल देताना नमूद केले की, स्फोटकांचा प्रकार काय होता, हे देखील सरकारी पक्ष सिद्ध करू शकला नाही आणि त्यांनी जे पुरावे सादर केले, ते आरोपींना दोषी ठरवण्यासाठी पुरेसे नव्हते.

साक्षीदारांचे जबाब आणि आरोपींकडून कथितरित्या हस्तगत केलेल्या वस्तूंना कोणतीही पुराव्याची किंमत नाही, असे सांगत न्यायालयाने १२ आरोपींची शिक्षा रद्द केली. या आरोपींपैकी पाच जणांना मृत्यूदंड, तर उर्वरित सात जणांना जन्मठेपेची शिक्षा विशेष न्यायालयाने सुनावली होती.

११ जुलै २००६ रोजी पश्चिम रेल्वे मार्गावरील विविध स्थानांवर सात ठिकाणी लोकल ट्रेनमध्ये स्फोट झाले होते, ज्यात १८० हून अधिक लोक ठार झाले आणि अनेक जखमी झाले.

"सरकारी पक्ष आरोपींविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यात पूर्णपणे अपयशी ठरला आहे. हे आरोपी हे गुन्हेगार आहेत, हे पटणे अवघड आहे. त्यामुळे त्यांची शिक्षा रद्द करण्यात येत आहे," असे उच्च न्यायालयाने म्हटले.

२०१५ साली विशेष न्यायालयाने पाच आरोपींना मृत्यूदंड व सात जणांना जन्मठेप सुनावली होती. उच्च न्यायालयाने हा निर्णय पलटवून सर्व १२ आरोपींना निर्दोष मुक्त केले आणि असेही म्हटले की, जर त्यांच्यावर अन्य कोणतेही गुन्हे प्रलंबित नसतील, तर त्यांना तात्काळ सोडण्यात यावे.

न्यायालयाने असेही नमूद केले की, सरकारी पक्षाच्या साक्षी व कथित हस्तगत केलेल्या वस्तूंना कोणतेही वैध पुराव्याचे महत्त्व नाही आणि त्यामुळे आरोपींना दोषी ठरवण्यासाठी त्या साक्षीवर विसंबणे सुरक्षित नाही.

खंडपीठाने आपला निकाल देताना हे देखील स्पष्ट केले की, या प्रकरणातील महत्त्वाच्या साक्षीदारांची




साक्ष घेण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरला आणि जप्त केलेल्या वस्तू – स्फोटके व सर्किट बॉक्स – यांचे योग्य प्रकारे सीलिंग व जतन करण्यात आले नव्हते.

"स्फोटकांचा प्रकार काय होता, हे देखील सरकारी पक्ष सिद्ध करू शकला नाही. त्यामुळे जप्तीचे पुरावे अपुरे आणि आरोपींवर दोष सिद्ध करण्यास असमर्थ ठरतात," असे खंडपीठाने सांगितले.

न्यायालयाने काही आरोपींच्या कथित कबुलीजबाबांनाही फेटाळले आणि म्हटले की, हे जबाब अत्याचार करून घेतले गेलेले वाटतात.

"हे कबुलीजबाब अपूर्ण आणि असत्य आहेत. काही भाग एकमेकांचे कॉपी-पेस्ट असल्याचे दिसते. आरोपींनी हे सिद्ध केले की, त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले होते," असेही खंडपीठाने नमूद केले.

आरोपींची झालेली ओळख परेडही न्यायालयाने अमान्य केली, कारण ती करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना त्यासाठी अधिकृत अधिकार नव्हता. साक्षीदारांनी दिलेल्या जबाबांनाही न्यायालयाने विश्वासार्ह मानले नाही – यात टॅक्सी चालक, स्फोटक ठेवताना पाहणारे, बॉम्ब बनवताना उपस्थित असणारे आणि कटाचे साक्षीदार असे सगळे साक्षीदार होते.

"या साक्षीदारांचे जबाब विश्वासार्ह किंवा अंतिम निर्णायक स्वरूपाचे नाहीत. त्यावर विसंबता येत नाही. बचाव पक्षाने ते पूर्णपणे खोडून काढले आहेत," असे न्यायालयाने म्हटले.

## विशेष न्यायालयाने ठोठावला होता ५ जणांना मृत्यूदंड तर ७ जणांना जन्मठेप

न्यायालयाने नमूद केले की, साक्षीदारांनी आरोपींची ओळख घटना घडल्यानंतर चार महिन्यांनी आणि न्यायालयात चार वर्षांनी केली. "या साक्षीदारांना त्या दिवशी आरोपींचा चेहरा नीट पाहण्याची संधीच नव्हती. त्यामुळे त्यांनी चेहरा लक्षात ठेवून ओळख केल्याचे म्हणणे पटण्यासारखे नाही," असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

२०१५ मध्ये विशेष न्यायालयाने १२ आरोपींना दोषी ठरवले होते. त्यापैकी पाच जणांना मृत्यूदंड आणि सात जणांना जन्मठेप झाली होती. या अपील सुनावणीदरम्यान एक आरोपी कमाल अन्सारी याचा मृत्यू झाला.

सोमवारी उच्च न्यायालयाने निकाल जाहीर केल्यानंतर, आरोपींना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे विविध तुरुंगांतून कोर्टात हजर करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी त्यांच्या वकिलांचे आभार मानले.

मृत्यूदंड देण्यात आलेले आरोपी होते – कमाल अन्सारी (आता मृत), मोहम्मद फैसल अता-उर-रहमान शेख, एहतिशाम कुतुबुद्दीन सिद्दीकी, नविद हुसेन खान आणि आसिफ खान. विशेष न्यायालयाने त्यांना बॉम्ब ठेवणे आणि इतर गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषी ठरवले होते.

तर, तनवीर अहमद मोहम्मद इब्राहिम अन्सारी, मोहम्मद माजिद मोहम्मद शफी, शेख मोहम्मद अली आलम शेख, मोहम्मद साजिद मारगूब अन्सारी, मुजम्मिल अता-उर-रहमान शेख, सुहैल महमूद शेख आणि जमीर अहमद लती-उर-रहमान शेख यांना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. वहीद शेख याला २०१५ मध्येच ट्रायल कोर्टाने निर्दोष मुक्त केले होते.

# संसेदत बोलू दिले जात नाही - राहुल गांधी

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**

संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले आहे. ऑपरेशन सिंदूरवरून पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी संसदेत विरोधकांनी गोंधळ करण्यास सुरुवात केली. लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांनी पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना पकडण्यात अद्याप का यश आलेले नाही, असा विचारणा केली. तसेच ऑपरेशन सिंदूरवर चर्चेची मागणी केली. ट्रम्प यांनी आपणच भारत-पाकिस्तान युद्ध थांबविल्याचा दावा केल्यावरूनही सभागृहात गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले. यातच संसदेत बोलू दिले जात नसल्याचा आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे.

पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी म्हणाले की, सभागृहात संरक्षण मंत्र्यांना बोलू दिले जात आहे. त्यांच्या लोकांना बोलायला दिले जाते. परंतु, विरोधक काही बोलू इच्छित असतील, तर त्यांना परवानगी नाकारली जाते. मी विरोधी पक्षनेता आहे. माझा हक्क आहे. मला कधी बोलू दिले जात नाही. हा नवा दृष्टिकोन आहे. सरकारने परवानगी दिल्यास चर्चा केली





जाईल. परंतु, मुद्दा असा आहे की, सरकारच्या बाजूने असलेल्या सदस्यांना बोलले दिले जात असेल, तर आम्हा विरोधकांनाही बोलण्याची संधी दिली गेली पाहिजे. आम्ही दोन शब्द बोलण्याची विनंती केली तरी विरोधकांना बोलू दिले जात नाही, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. राहुल गांधी संसद परिसरात पत्रकारांशी बोलत होते.

काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी बंधू राहुल गांधी यांचे समर्थन केले आहे. विरोधकांना बोलण्याची संधी दिली पाहिजे. सरकारने ऑपरेशन सिंदूरचा मुद्दा टाळण्याऐवजी त्यावर निवेदन करायला हवे, चर्चा करायला हवी, असे प्रियंका गांधी यांनी म्हटले आहे. लोकसभेचे कामकाज सुरू होताच विरोधी बाकावरील सदस्यांनी गोंधळ करायला सुरुवात केली. या गोंधळामुळे लोकसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले होते. तर राज्यसभेतही काँग्रेस सदस्य मल्लिकार्जुन खरगे यांनी ऑपरेशन सिंदूरवरून सरकारवर टीका केली. याला भाजपा सदस्य जेपी नड्डा यांनी उत्तर दिले. विरोधकांच्या गोंधळामुळे राज्यसभेचे कामकाज सुरुवातीला १२ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले होते.

दरम्यान, ऑपरेशन सिंदूर दरम्यान जगाने भारतीय सैन्याची ताकद पाहिली. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत २२ मिनिटांत दहशतवाद्यांच्या ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले आणि ती ठिकाणे जमीनदोस्त करण्यात आली. मेड इन इंडिया लष्करी शक्तीच्या या नवीन स्वरूपाकडे जग खूप आकर्षित झाले आहे. जेव्हा मी जगातील लोकांना भेटतो तेव्हा भारताने बनवलेल्या मेड इन इंडिया शस्त्रांबद्दल जगाचे आकर्षण वाढत आहे, असेच दिसते, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेचे अधिवेशन सुरू होताना सांगितले.


## बॉम्ब, बंदूक, पिस्तुलसमोर संविधानाचा विजय होतोय- पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**



पाऊस प्रत्येक कुटुंबीयांच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचा आहे. येणाऱ्या काळात याचा देशाला फायदा होईल. हे पावसाळी अधिवेशन देशासाठी गौरवाचं अधिवेशन ठरेल, असं सांगतानाच बॉम्ब, बंदूक आणि पिस्तुलासमोर आपल्या संविधानाचा विजय होत आहे, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. आजपासून संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. या अधिवेशनाला सुरुवात होण्यापूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मीडियाशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. पाऊस नाविन्य आणि नवसृजनाचं प्रतिक आहे. आतापर्यंत आलेल्या बातम्यानुसार देशभरात चांगला पाऊस झाला आहे. शेतीसाठी चांगला पाऊस पडत आहे. वातावरण चांगलं असल्याच्या बातम्या आहेत. पाऊस हा शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था, देशाची अर्थव्यवस्था, ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था आणि प्रत्येक कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचा आहे. गेल्या दहा वर्षात यावेळी तीनपट पाण्याचा साठा वाढला आहे. त्याचा आपल्या अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होणार आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

# मुंबईत एअर इंडियाचे विमान धावपट्टीवरुन घसरले



**मुंबई, दि. २१ प्रतिनिधी**

एअर इंडियाचे आणखी एक विमान सोमवारी अपघात होण्यापासून थोडक्यात बचावले. कोची येथून मुंबईला आलेले AI2744 हे विमान जोरदार पावसामुळे मुंबई विमानतळावर लँडिंगनंतर थोडे घसरले. यामुळे ते धावपट्टीवरुन बाहेर गेले. त्यानंतर पायलटने विमानावर पुन्हा नियंत्रण मिळवत विमान सुरक्षितपणे गेटवर आणले. यातील सर्व प्रवासी आणि क्रू मेंबर्स सुरक्षित आहेत. पुढील तपासणीसाठी हे विमान थांबवण्यात आले आहे. ही घटना सकाळी ९.२७ वाजता घडली.

यातील सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित आहेत. यामुळे विमानतळाच्या मुख्य धावपट्टीचे किरकोळ नुकसान झाले आहे. दुसरी पर्यायी धावपट्टी सुरु करण्यात आली आहे, अशी माहिती छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाचे प्रवक्त्यांनी दिली आहे.

दरम्यान, हे विमान धावपट्टीवरून बाहेर गेल्यानंतर त्याचे तीन टायर फुटले असून इंजिनचेही नुकसान झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

अधिक मिळालेल्या माहितीनुसार, सदर विमान टचडाऊन झोनजवळ उतरल्यानंतर धावपट्टीपासून १६ ते १७ मीटर दूर गेले. पण ते सुरक्षितपणे परतले आणि सामान्यपणे ते पार्किंग दिशेने नेण्यात आले. सर्व प्रवासी सुखरूप असल्याचे सांगण्यात आले आहे. मुंबई विमानतळाने जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे की, २१ जुलै रोजी सकाळी ९:२७ वाजता मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे कोचीहून आलेले एक विमान लँडिंगदरम्यान धावपट्टीवरून बाहेर गेले. यानंतर ही घटना हाताळण्यासाठी विमानतळावरील आपत्कालीन प्रतिसाद पथकांना तत्काळ सक्रिय करण्यात आले.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाचे एक पथक याच्या चौकशी करण्यासाठी विमानतळावर आले आहे, असेही सूत्रांनी सांगितले.



## अजितदादांच्या सूचनेनंतर सूरज चव्हाणांचा प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा

**मुंबई, दि. २१ प्रतिनिधी**

लातूर येथे अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण करणारे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांची अखेर उचलबांगडी झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा अजित पवार (यांनी सूरज चव्हाण यांना तातडीने भेटायला बोलावले होते. मात्र, या भेटीपूर्वीच अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची सूचना दिली. अजित पवार यांनी भेटायला बोलावल्यानंतरच सूरज चव्हाण यांच्यावर कारवाई होणार, असे संकेत मिळत होते. दरम्यान, सूरत चव्हाणांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे वृत्त आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही सूरज चव्हाण यांच्या कृत्याबद्दल जाहीर नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर आता अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांना पदमुक्त होण्याचे आदेश दिले. त्यामुळे आता सूरज चव्हाण लवकरच आपल्या पदाचा राजीनामा देतील, असे सांगितले जाते. अजित पवार यांनी सोमवारी यासंदर्भात एक ट्विट केले. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, काल लातूरमध्ये घडलेल्या अत्यंत गंभीर आणि निषेधार्ह घटनेच्या पार्श्वभूमीवर, मी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांना त्यांच्या पदाचा त्वरित राजीनामा द्यायच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. पक्षाच्या मूल्यांच्या विरोधात जाऊन केले जाणारे वर्तन कोणत्याही स्थितीत स्वीकारले जाणार नाही, यासाठी हा कठोर निर्णय घेतला आहे, असे अजित पवार यांनी सांगितले. सूरज चव्हाण हे अजित पवार यांच्या निकटवर्तीयांपैकी एक होते. अजित पवारांनी शरद पवारांची राष्ट्रवादी सोडल्यानंतर त्यांच्यासोबत सुरुवातीच्या टप्प्यात बाहेर पडणाऱ्या नेत्यांमध्ये सूरज चव्हाण यांचा समावेश होता. त्यामुळे सूरज चव्हाण यांच्यावर झालेली ही कारवाई मोठे पाऊल मानले जात आहे.

## अजून मारा पण कृषीमंत्र्यांचा राजीनामा घ्या - विजयकुमार घाडगे

**धाराशीव, दि.२१ प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या पत्रकार परिषदेत पत्ते फेकल्यामुळे अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांना राष्ट्रावादीचे युवा प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण आणि कार्यकर्त्यांकडून बेदम मारहाण झाली. या मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर राज्यभरातून रोष व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांना राजीनामा देण्याची सूचना केलीय. दुसरीकडे मारहाण झालेल्या विजयकुमार घाडगे यांनी आम्हाला आणखी मारा पण कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंवर कारवाई करा अशी मागणी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानपरिषदेत मोबाईलवर रम्मी खेळतानाचा व्हिडिओ समोर आल्यानंतर अखिल भारतीय छावा संघटनेने त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. मात्र सुनील तटकरे यांना निवदेन दिल्यानंतर छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण झाली. या मारहाणीनंतर सूरज चव्हाण यांना राजीनामा द्यायला सांगितला आहे. मात्र सूरज चव्हाणच्या राजीनाम्याने आम्ही समाधानी नाही आहोत, कारण आमची मुख्य मागणी कृषीमंत्र्यांना बडतर्फ करण्याची होती, असं विजयकुमार घाडगे यांनी बोलताना म्हटलं. त्यामुळे आता कृषीमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलनाला सुरुवात झाल्याचेही घाडगे म्हणाले.

"सुरज चव्हाणच्या राजीनाम्याचा काय संबंध? त्यांच्या राजीनाम्याची आमची मागणीच नव्हती. त्यांनी राजीनामा दिला आणि आम्ही समाधानी होऊ असं कोणतं पद आहे त्यांच्याकडे. राज्याच्या कृषिमंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे अशी आमची मागणी होती. त्या कृषिमंत्र्यांना तुम्ही बडतर्फ करा. अशा लोकांना राजीनामा द्यायला सांगून आमचा तोंडाला पानं पुसता आहात का? कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना अजित पवार आणि सुनील तटकरे यांनी पदावरून काढून टाकले पाहिजे ही आमची मागणी आहे. शेतकऱ्यांची जी अवहेलना सुरू आहे ती थांबली पाहिजे," असं विजयकुमार घाडगे म्हणाले.

## कृषीमंत्री कोकाटेंचा खुलासा अयोग्यच- सुनील तटकरे

**धाराशीव, दि.२१ प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेण्यासंदर्भात निवेदन देणाऱ्या छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना, राष्ट्रवादी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून बेदम मारहाण करण्यात आली होती. यात छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे पाटील यांचाही समावेश होता. या घटनेनंतर आज सुनील तटकरे यांनी धाराशीव येथे छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधला. यावेळी, जी घटना



घडली, त्याचं मी समर्थन केलेलं नाही आणि करणारही नाही. मी कालय या संदर्भात बोललो आहे. त्यांना (सुरज चव्हाणांवर) आज राष्ट्रीय अध्यक्षांनी बोलावले आहे. मी उद्या दिल्लीला चाललो आहे. तेथून आल्यानंतर त्यासंदर्भात आम्ही निर्णय घेऊ, असे तटकरे यांनी म्हटले आहे. याच वेळी त्यांनी माणिकराव कोकाटे यांच्यासंदर्भातही भाष्य केले.

पुढे बोलताना तटकरे म्हणाले, "राहिला प्रश्न माणिकराव कोकाटे यांचा, तर त्यांच्याबद्दलही मी काल असं म्हणालो आणि आताही आपल्यासोबत म्हणतोय. चार-पाच वेळा माणिकरावांची वक्तव्ये शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून अयोग्य पद्धतीची आली. पक्षाने गांभीर्याने त्याची नोंद घेतली. एक-दोनदा दादांनी त्यांना समजही दिली. पण कालचा जो व्हिडिओ बाहेर आला तो, नंतर माणिकरावांनी जरी त्यात काही खुलासा करण्याचा प्रयत्न केला असेल, तरी तोसुद्धा काही योग्य आहे, असं मला वाटत नाही."

## तटकरेंनीच मराठा द्वेषातून छावाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला घडवून आणला - जरांगे पाटलांचा आरोप

**जळगाव, दि. २१ प्रतिनिधी**

आम्हाला अशी शंका आहे की हा हल्ला तटकरे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीच घडवून आणलाय. हा तटकरे साहेबांनी सांगून घडवून आणलेला हल्ला आहे. म्हणजे किती मराठा द्वेष आहे यांच्यात यातूनही दिसून आलं आहे. विजय भैय्या हे शेतकऱ्यांचे लेकरू आहे. ते जर आज मागणी करायला गेलेत तर तुम्ही त्यांना मारता. म्हणजे हे तुम्हाला सोपं जाणार नाही. असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. अजित दादांनी कठोरात कठोर कारवाई करून केवळ पदावरूनच नव्हे तर पक्षातूनच हाकालपट्टी केली पाहिजे अशी मागणी ही मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. मी पुणे दौऱ्यावर असतानाच ज्ञानेश्वरी मुंडे ताईंना भेटीसाठी येणार असल्याचे सांगितलं होतं. आज मी परळी येथे भेट घेत सविस्तर माहिती जाणून घेणार आहे. तिच्या पतीची अतिशय क्रूरपणे हत्या करण्यात आली आहे. या विरोधात आम्ही राज्याचे एक नागरिक म्हणून उभे राहणार आहोत. सोबतच मुंडे ताईंना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरणार आहोत. तसेच आज लातूरला जाऊन विजय भैय्या यांचे देखील तब्येतीची विचारपूस करण्यासाठी मी जात आहे. अशी माहितीही मनोज जरांगे पाटील यांनी यांनी दिली.

# चार दिवसात 13 कोटी जमा मालमत्ता कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद

**पनवेल ।** मालमत्ता करांवरील शास्तीमध्ये सवलत देत पनवेल महापालिकेने दिनांक 18 जुलै पासून ते 20 सप्टेंबर या कालावधीकरीता 'अभय योजना' विविध टप्प्यामध्ये लागू केली आहे. या योजनेचा नागरिकांनी लाभ घेऊन आपला मालमत्ता कर पुर्ण भरावा असे आवाहन पनवेल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले होते.या आवाहनाला महापालिका कार्यक्षेत्रातील चा प्रचंड प्रतिसाद दिसून येत आहे. अवघ्या चार



दिवसात पालिकेच्या तिजोरीत 13 कोटी 16 लाख मालमत्ता कर जमा झाला आहे.

येत्या काळामध्ये महानगरपालिकेने अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. विविध विकास कामांमध्ये प्रस्तावित कामांमध्ये नवीन मुख्यालय बांधणे, मच्छी मार्केट, बहुमजली वाहनतळ, शाळा ,दैनिक बाजार, प्रभाग कार्यालये 'हिरकणी' हे माता व बाल संगोपन रूग्णालय-सर्व समावेशक ४५० बेडचे हॉस्पीटल उभारत आहे. या सर्व प्रस्तावित कामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत आहे. त्यामुळे मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# प्रभाग समिती अ खारघर अंतर्गत, सेक्टर 27, खारघर येथे पनवेल महानगरपालिका, उद्यान विभागामार्फत वृक्षारोपण

**पनवेल ।** महानगरपालिका उद्यान विभाग आणि कॉज ट्रॅव्हलर्स सोशल वेल्फेअर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच खारघर येथे वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त श्री. मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत सेक्टर २७, खारघर येथे अमलतास आणि कांचन अशा २६ वृक्षांचे रोपण करण्यात आले. सदर कार्यक्रमाला कॉज ट्रॅव्हलर्स सोशल वेल्फेअर संस्थेचे अध्यक्ष भाल शेखर चिलाना, बँक ऑफ इंडिया सेक्टर ३५ खारघर शाखा व्यवस्थापिका रोहिणी राठोड तसेच खारघर



येथील वृक्षारोपणाच्या मोहिमेमध्ये नेहमी पुढाकार घेत असलेल्या समाजसेविका छाया तारळेकर उपस्थित होत्या.

सहा. आयुक्त डॉ. रूपाली माने व उद्यान विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागातील उद्यान पर्यवेक्षक नितीन राठोड, रुपेश चित्रुक सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक वैभव ठाकरे यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

# महाडच्या चवदार तळ्यावर आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा




**महाड निलेश लोखंडे ।** 6 महाराष्ट्र बटालियन एनसीसी, मुंबई ग्रुप 'A' यांच्या मार्गदर्शनानुसार, आंतरराष्ट्रीय योग दिन 2025 उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड येथील एनसीसी युनिटच्या नेतृत्वाखाली, फजंदार हायस्कूल, वहूर आणि एन.एम. जोशी विद्यालय, गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने, महाड येथील ऐतिहासिक चवदार तळ्यावर हा विशेष कार्यक्रम शनिवार, 21 जून 2025 रोजी संपन्न झाला.

कार्यक्रमात ताडासन, वृक्षासन, पदहस्तासन, त्रिकोणासन आणि उत्कटासन या उभ्या प्रकारच्या योगासने सादर करण्यात आली. कमविचे उपप्राचार्य, प्राध्यापक एस.टी. वानखेडे सर यांनी योगाचे प्रात्यक्षिक सादर करत सर्व सहभागी कॅडेट्सकडून सामूहिक योगासनांचे प्रभावी सादरीकरण करून घेतले.

कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितांमध्ये प्राचार्य डॉ. योगेश प्रभाकर बोराळे, कमविचे उपप्राचार्य श्री. सुरेंद्र वानखेडे, एनसीसी ऑफिसर श्री. दिपक वळवी, फजंदार हायस्कूलचे काळजीवाहू अधिकारी श्री. विनय खैरे, आणि गोरेगावचे एनसीसी अधिकारी श्री. रवींद्र गावित यांचा समावेश होता.

चवदार तळे हे केवळ महाडचे ऐतिहासिक ठिकाण नसून, भारतातील सामाजिक समतेच्या चळवळीचे जागतिक प्रतीकस्थान मानले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ साली येथे सत्याग्रह करून अस्पृश्यांसाठी पाण्याचा सार्वजनिक हक्क मिळवून दिला. या घटनेने सामाजिक न्याय, मानवी हक्क, आणि मानवतेच्या मूलभूत मूल्यांची ग्वाही दिली.

आजही चवदार तळे जगभरातील मानवाधिकार कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्थान आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय योग दिनासारखा आरोग्यविषयक उपक्रम या ठिकाणी साजरा होणे, हे योगासारख्या भारतीय परंपरेला सामाजिक समतेच्या मूल्यांशी जोडणारे एक ऐतिहासिक व वर्तमान संयोग ठरले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. धनंजय कोळेकर व त्यांच्या कर्मचाऱ्यांचे बहुमोल सहकार्य लाभले. त्यांच्या मदतीने चवदार तळ्यासारख्या संवेदनशील ऐतिहासिक स्थळी कार्यक्रम शांतता, शिस्त आणि सुसंगतीने पार पडला.

कार्यक्रमाच्या समारोपाला मान्यवरांनी उपस्थित एनसीसी कॅडेट्सचे शारीरिक सक्षमीकरणासोबत सामाजिक जागृतीच्या भूमिकेचेही कौतुक केले. योग, शिस्त, समता आणि देशभक्ती यांचे समरस दर्शन या उपक्रमाच्या माध्यमातून घडल्याची भावना सर्वत्र दिसून आली.

# लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरांचे आयोजन

**पनवेल ।** राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार दिनांक २२ जुलै पनवेलमध्ये विविध ठिकाणी रक्तदान शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल उत्तर मंडलाचे रक्तदान शिबीर रामशेठ ठाकूर महाविद्यालय, सेक्टर ३, पेठगाव येथे, खारघर शहर मंडल शिबीर रामशेठ ठाकूर स्कुल, सेक्टर १९, खारघर येथे, कामोठे शहर मंडल शिबीर आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय सेक्टर ३६, कामोठे येथे, कळंबोली शहर मंडल शिबीर आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय सेक्टर ८ कामोठे येथे, पनवेल शहर मंडल शिबीर भाजप मध्यवर्ती कार्यालय पनवेल येथे,



नवीन पनवेल मंडलाचे शिबीर रोटरी ब्लड बँक खांदा कॉलनी तर पनवेल पूर्व मंडलाचे शिबीर सेंट अँड्र्यू स्कुल आकुर्ली येथे होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात विविध विधायक उपक्रम राबवले जात आहेत. यामध्ये वृक्षारोपण दिव्यांग बांधवांना मदत, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप यांसारख्या अनेक उपक्रमांचा समावेश आहे. पनवेलमध्ये रक्त संकलन करण्याचा उद्देश ठेवून मुख्यमंत्र्यांच्या वाढदिनी विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या शिबिरात अधिकाधिक रक्तदात्यांनी सहभाग घेऊन हे सामाजिक उपक्रम यशस्वी करावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी केले आहे.

# सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त हाशिवरे येथे पाककला स्पर्धा

**अलिबाग रत्नाकर पाटील ।**
रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे यांच्या 70 व्या वाढदिवसाचे औचित्य साधून ना. आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग तालुक्यातील महात्मा गांधी विद्यालय हाशिवरे येथे रविवार दि.२० जुलै रोजी पाककला स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते.अलिबाग तालुक्यातील महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने तसेच अलिबाग मुरुड विधानसभेचे अध्यक्ष अमित नाईक यांच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

रायगड जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्षा उमा मुंढे आणि अमित नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या या पाककला स्पर्धा प्रवेशशुल्काविना होती. या पाककला स्पर्धेसाठी १२५



महिलांनी सहभाग घेतला होता. सहभागी झालेल्या महिलांनी विविध पाककृती तयार केल्या होत्या.स्पर्धेतील पहिल्या चार विजेत्यांना अनुक्रमे 8 हजार रूपये, 5 हजार रूपये, 3 हजार रूपये आणि 2 हजार रूपये अशी रोख रक्कमेसह प्रमाणपत्र मान्यवरांच्याहस्ते प्रदान करण्यात आले. सहभागीसर्व स्पर्धकांना भेटवस्तू देण्यातआली.त्याचबरोबर मुरुड विधानसभेचे अध्यक्ष अमित नाईक यांनी स्वखर्चाने उत्तम पदार्थ बनवलेल्या १४ महिलांना त्यांच्या हस्ते पारितोषिक दिले.

दरवर्षीप्रमाणे महिलांनी या पाककला स्पर्धेस उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.महिलांनी बनवलेल्या पदार्थांना बाजारपेठ मिळावी व त्यांना स्वयंरोजगार मिळावा या उदात्त हेतूने आम्ही पाककला स्पर्धा भरवत असल्याचे प्रतिपादन महिला राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्षा उमा मुंढे यांनी केले. ,अलिबाग मुरुड विधानसभेचे अध्यक्ष अमित नाईक,युवती अध्यक्ष मुस्कान ताई , जिल्हा सरचिटणीस मानसी चेऊलकर,तालुका अध्यक्ष आरती मोकल,शहर अध्यक्ष मेघना भोईर उपस्थित होत्या.

# पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात जखमी अवस्थेत तरुण तीन तास उपचाराविना विव्हळत सार्वजनिक आरोग्य सेवेचा भोंगळ कारभार

## डॉक्टर सुट्टीवर 108 व 102 रुग्णवाहिका उपलब्ध नाही

**सुधागड गौसखान पठाण ।**
पालीतील प्राथमिक आरोग्य केंद्रात गंभीर जखमी अवस्थेत उपचार घेण्यासाठी रविवारी (ता. 20) दुपारी आदिवासी समाजाचा रोशन सत्यवान पवार हा तरुण आला होता. मात्र यावेळी येथे एकही डॉक्टर उपलब्ध नव्हते. अडीच ते तीन तासानंतर खवली येथील डॉक्टरांनी येऊन या तरुणाला तपासले व इथे उपचार करणे शक्य नसल्याचे सांगून या तरुणाला जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे उपचारासाठी नेण्यास सांगितले. मात्र 108 व 102 रुग्णवाहिका सुद्धा उपलब्ध झाल्या नाहीत. नाईलाजाने पदरमोड करून खाजगी रुग्णवाहिकेतून या तरुणाला अलिबाग येथे देण्यात आले.

रोशन पवार याच्या कानातून रक्त येत होते. पाठीवर अनेक मारहाणीच्या खुणा देखील होत्या. मात्र प्राथमिक आरोग्य केंद्रात एकही डॉक्टर उपलब्ध नव्हता. आरोग्य केंद्रात केवळ दोन परिचारिका उपस्थित होत्या. डॉक्टर अभावी रुग्णाला तीन तास ताटकळत राहावे लागले. यावेळी त्या ठिकाणी उपस्थित असलेले रिपब्लिकन सेना रायगड जिल्हा अध्यक्ष अमित गायकवाड यांनी



**शासकीय रुग्णवाहिका बेभरवशाच्या**

शासनाने नेमलेल्या 108 व 102 या नंबर वरील दोन्ही रुग्णवाहिका नसल्याने सुद्धा रुग्णाचे हाल झाले. 108 क्रमांकाची रुग्णवाहिका खोपोली येथून संध्याकाळी सात वाजता उपलब्ध होणार होती. तसेच पालीतील 108 क्रमांकाची रुग्णवाहिका माणगाव येथे गेली होती. व तेथून घरोशीवाडी येथे बस पलटी झाल्याने तिथे रुग्णांना आणण्यासाठी गेली होती. त्यामुळे तिलाही पालीत येणे शक्य नव्हते. तर 102 क्रमांकाची रुग्णवाहिका ही रुग्णाला घेऊन गेली होती, त्यामुळे तिलाही उशीर होणार होता. या जखमी तरुणावर लवकर उपचार होणे गरजेचे होते. कारण आधीच त्याला प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तीन तास तात्कळत राहावे लागले परिणामी त्याच्या नातेवाईकांनी त्याला खाजगी रुग्णवाहिकेतून नेले.

सांगितले की, प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन डॉक्टर आहेत. त्यापैकी डॉ. प्रियंका गवळी या रीतसर रजेवर होत्या. तर डॉ. अभिजीत तळेकर हे स्वतःचा मोबाईल बंद करून गायब होते. याबाबतीत अमित गायकवाड यांनी परिचारिका यांना विचारणा केली असता आम्हाला डॉक्टर कुठे आहे. माहिती नाही असे सांगण्यात आले. दरम्यान रुग्णाची परिस्थिती गंभीर असल्याने त्याच्या समवेत असलेल्या नातेवाईकांनी यांनी गोंधळ घातला पर्यायाने उपस्थित असलेल्या परिचारिकांनी खवली येथील डॉक्टर शुभम चिवेगावे यांना फोन केला. यानंतर दहा मिनिटांनी ते आले रुग्णाला तपासून इथे उपचार होणार नाही, म्हणून अलिबाग येथे जिल्हा रुग्णालयात पाठवले.

# एसटी महामंडळाचा पैसा ठेकेदारांच्या घशात घालण्याचा आणखी एक उपक्रम?

**पेण समिर घायतळे ।** एसटी महामंडळ हे या राज्याची सामान्य जनतेची जननी म्हणून कार्यरत आहे आजवर अनेक संकटे आले त्या सर्व संकटावर मात देऊन अविरत सेवा देत आहे परंतु राजकीय नेते व प्रशासकीय अधिकारी हे आधीच आर्थिक संकटात एसटी महामंडळ आणण्याचा महामंडळास आणखीन खर्चात पाडत आहेत सध्या एसटी महामंडळाचे 550 वर एसटी आगर व बस स्थानके आहेत त्यांची साफसफाई आपल्या कर्मचाऱ्यांचा व काही ठिकाणी ठेकेदारांकडून केली जात आहे तसेच 550 पैकी 300 च्या वर बस स्थानकातील स्वच्छतागृह हे खाजगी संस्था त्यांच्या स्वतःच्या खर्चाने त्यांची देखभाल करीत आहेत. आता एसटी महामंडळाचा नियोजन विभागामार्फत एक निविदा काढण्यात येणार असून संपूर्ण महाराष्ट्र एकच ठेकेदाराची नियुक्ती करणार आहे त्याकरिता वार्षिक करोडो रुपयांचा खर्च अपेक्षित आहे असाच प्रयोग यापूर्वीही करण्यात आला होता परंतु तो संपूर्ण फ्लॉप ठरला व त्यावेळी एसटी महामंडळाचे करोडो रुपयाचा चक्काचूर करण्यात आला एकदा फ्लॉप केलेले प्रयोग पुन्हा पुन्हा एसटी महामंडळाचे करोडो रुपये ठेकेदाराच्या व काही संधी साधू ठेकेदाराच्या खिशात घालण्याचा महामंडळाचा डाव आहे. यामध्ये महामंडळाचे अधिकारी गुंतले असल्याचे बोलले जाते. तीनशे प्रसाधन गृह जे सामाजिक संस्था चालवितात त्यांचा संपूर्ण मेंटेनन्स तेथील कर्मचाऱ्यांचा पगार लाईट व स्वच्छतेचे साहित्य हे त्या त्या संस्था




करतात हे सर्व बंद केल्यास हा सर्व खर्च एसटी महामंडळास करावा लागेल व तो वर्षाला करोडो च्या घरात असेल आणि ते एसटी महामंडळास परवडण्याजोगे नाही एसटी महामंडळ आपले कर्मचारी जे दिवस-रात्र सेवा देत असतात त्यांचा पगार वेळेवर देत नसताना आर्थिक दृष्ट्या तो त्यांची निविदा कोणास खुश करण्याकरिता महामंडळ काढीत आहे हा प्रश्नच आहे. ज्या सामाजिक संस्था स्वतः पुढे येऊन एसटी महामंडळाची प्रसाधनगृह करताना चालवीत आहेत त्यांचे लाईट बिल पिटी बिल स्वतःच भरत आहेत. अशा संस्थेतील महामंडळाने सहकार्य केले तर एसटी महामंडळाला वर्षाला करोडो रुपयाचा खर्च कमी होईल. जन माणसात शासनाची प्रतिमा चांगली ठेवायची असेल तर अशा निविदा त्वरित रद्द करण्यात याव्यात अन्यथा काही वर्षांनी एसटी महामंडळ होते असे बोलण्याची सामान्य जनतेवर वेळ येईल. अजूनही वेळ गेलेली नाही एसटी महामंडळने आर्थिक दृष्ट्या फायद्याचे निर्णय घेऊन एसटी महामंडळ वाचवावयास पाहिजे.

# तळा तालुक्यातील भातलावणीची कामे अंतिम टप्प्यात.

**तळा श्रीकांत नांदगावकर ।**
तालुक्यात भातशेती लावणीच्या कामात सध्या शेतकरी व्यस्त असून भातशेतीची ७५ टक्के लागवड पुर्णत्वासकडे गेली आहे. यावर्षी पावसाने वेळेपूर्वीच हजेरी लावली. मे महिन्याच्या अखेरीस झालेला अवकाळी पाऊस त्यापाठोपाठ मान्सूनची हजेरी यामुळे शेतीच्या कामात अनेक अडचणी आल्या. शेतकऱ्यांना धुळवाफ्याची पेरणी करताच आली नाही. अनेकांनी चिखलपेरा केला तर काहींनी राहू पध्दतीने पेरणी केली.

तळा तालुक्याचा भाग हा अधिक प्रमाणात डोंगराळ वरकस भातशेतीचा आहे. जून महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. तळ्यामध्ये जून महिन्यापासून भात शेतीच्या लागवडीला सुरूवात झाली. यावर्षी तालुक्यात भात पिकाखाली ९४९.८० हेक्टर असून ७३६.५० हेक्टरवर भातशेतीची



लावणी पुर्णत्वास गेली आहे. त्याच बरोबर नाचणी पिकासाठी २९१.५८ हेक्टर क्षेत्र लागवड योग्य असून आज अखेर पर्यंत ३०.५० हेक्टर क्षेत्रावरती पेरणी करण्यात आली असून आज अखेर पर्यंत १९०.०७ हेक्टर क्षेत्रावरती नाचणीची लावणी पुर्ण करण्यात आली आहे. आता पर्यंत तळा तालुक्यात अंदाजे सरासरी ५० टक्केपर्यंत पावसाची नोंद झाली आहे. एकंदरीत परिस्थिती समाधानकारक असून शेतकरीवर्ग लावणीच्या कामात व्यस्त आहे.अंदाजे १० दिवसांत लावणीची कामे आटोपतील असे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे.

पाऊस आजपर्यंत चांगला पडत आहे. त्यामुळे शेती चांगली आहे. तालुक्यात भातशेती क्षेत्रात तंत्रज्ञानाचाही शेतकरी वर्ग वापर करत असून चारसूत्री भातशेती लागवड, सामुहीक शेती, बचतगटांनी केलेली सामुहीक शेती यामुळे अनेक दृष्टीने वेळ व मजूरांची बचत होते. त्याच बरोबर उत्पन्नातही वाढ होत असल्याने शेतकरीवर्ग कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली सामुहिक शेतीकडे वळत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# पीओपीच्या गणेशमूर्तीवर सरकारने बंदी लादली

**पेण समीर घायतळे ।** केंद्र सरकारच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तीवर बंदी लादली, गणेशमूर्तिकारांनी हा लढा लढल्याने न्यायालयाने ही बंदी शिथिल केली. पण त्याचे श्रेय लाटण्यासाठी मात्र पुन्हा भाजपचे नेतेच पुढे सरसावले. सांस्कृतिक कार्यमंत्री आणि भाजप नेते आशीष शेलार यांनी आज पेणमध्ये येऊन गणेशमूर्ती कारखानदारांकडून स्वतःचा सत्कार करवून घेतल्याने हा विषय पेणकरांमध्ये चर्चेचा ठरला आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पीओपीच्या गणेशमूर्तीवर पाच वर्षांपूर्वी बंदी लादली. न्यायालयाने या नियमांचे पालन करण्याचे आदेश सरकारला दिले. त्यामुळे हजारो गणपती कारखानदार आणि गणेशमूर्तिकार अडचणीत सापडले होते. केवळ पेण तालुक्यात १ हजार ६०० लहान-मोठे गणेशमूर्ती कारखाने असून १७ लाख पीओपी गणेशमूर्ती तयार करण्यात येतात. या बंदीमुळे ३०० कोटी रुपयांचा हा व्यवसाय अडचणीत सापडला होता.

गणेशमूर्तिकारांनी एकजुटीने याविरोधात न्यायाल यात लढा दिला. त्यानंतर मुंबई उच्च न्यायाल याने पीओपी गणेशमूर्ती तयार करणे आणि विक्री करण्यावर घातलेली बंदी उठवली. मात्र याचे श्रेय घेण्यासाठी भाजपचे नेते लगोलग पुढे सरसावले. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री व रायगडचे संपर्कमंत्री आशीष शेलार आणि भाजपमुळेच ही बंदी हटल्याची पेणमध्ये जोरदार बॅनरबाजी करण्यात आली. त्यानंतर शेलार यांनी पेण तालुक्यातील हमरापूर येथे जाऊन सत्कारही स्वीकारले. या कार्यक्रमाला गर्दी वाढवण्यासाठी तालुक्यातील सर्व गणेशमूर्ती कारखानदारांना उपस्थित राहण्याची सक्ती करण्यात आली.

# गोविंद कासार यांची भाजप जिल्हा चिटणीस पदी नियुक्ती.

## सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव.

**माणगाव राम भोस्टेकर ।**
माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागातील हिंदुत्ववादी संघटना आणि आणि भारतीय जनता पार्टी संलग्न संघटना तसेच माणगाव तालुका समन्वय समिती सदस्य तसेच भारतीय जनता पार्टी निजामपूर विभाग अध्यक्ष ते माणगाव तालुका भाजप अध्यक्ष म्हणून पक्षनिष्ठेने काम केलेल्या व पक्षसंघटना वाढीसाठी काम करणारे भाजप चे निष्ठावान कार्यकर्ते कोस्ते खुर्द ग्रामपंचायत माजी सदस्य गोविंद परशुराम कासार यांच्यावर भारतीय जनता पार्टी ने अजून वाढीव जबाबदारी सोपावली आहे गोविंद कासार यांची भाजप जिल्हा चिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे.



भारतीय जनता पार्टी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण,भाजप जिल्हाध्यक्ष खास.धैर्यशीलदादा पाटील, विधानपरिषद गटनेते आम.प्रविणभाऊ दरेकर, जिल्हा भाजप निवडणूक प्रमुख सतिश धारप,आम. प्रशांत ठाकूर, आ. रविशेठ पाटील, आ. महेश बालदी, यांच्या सर्वांनुमते गोविंद यांची भाजप रायगड जिल्हा चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली असून तसे नियुक्तीपत्र देखील त्यांना देण्यात आले आहे.

पक्षाने सोपवलेली नवीन जबाबदारी मी इमाने इतबारे पार पाडणार असल्याचे तसेच पक्षसंघटना मुळापासून मजबूत करण्यासाठी प्रयत्न करेन व पक्षाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरवेन असे मत गोविंद कासार यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले आहे.

# उपायुक्त अजित मुठे, सहाय्यक आयुक्त मनोज वनमाळी यांच्यावर कारवाईची टांगती तलवार

## महापालिका आयुक्तांना कारवाई करण्याचे न्यायालयाचे निर्देश

## वसईतील अनधिकृत बांधकामाला अधिकाऱ्यांचे प्रोत्साहन




**वसई, दि. २१ : प्रतिनिधी**

वसई विरार महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामाला एमआरटीपी अंतर्गत केवळ नोटीस बजावून निष्कासन करवाई करण्यास जाणूनबुजून दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात यावी, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने महापालिका आयुक्तांना दिले आहेत.

वसई गाव मौजे चुळणे येथील सर्व्हे क्रमांक : 123 हिस्सा क्रमांक : 1 ते 6 या खासगी जागेतील अनधिकृत बांधकाम अविनाश डॉमनिक घोसाळ यांनी प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका (WRIT PETITION NO.16958 OF 2024) दाखल केलेली होती. या याचिकेत महाराष्ट्र राज्य व वसई-विरार महापालिका यांना प्रतिवादी केले होते. 20 जून 2025 रोजीच्या या याचिकेवरील सुनावणीत न्यायमूर्ती ए. एस. गडकरी व कमल खता यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. निर्णय दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत या संबंधीचा अनुपालन अहवाल न्यायालयात सादर करण्याचे आदेशही आयुक्तांना देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे सहाय्यक आयुक्त मनोज वनमाळी व उपायुक्त अजित मुठे यांच्यावर कारवाईची टांगती तलवार निर्माण झाली आहे.

सदर प्रकरणात सहाय्यक आयुक्त मनोज वनमाळी व उपायुक्त अजीत मुठे यांच्यावतीने महापालिकेच्या वकील स्वाती सागवेकर यांनी प्रतिज्ञापत्र सादर केलेले होते. सदर प्रतिज्ञापत्रात संबंधित बांधकामाचे नियमितीकरण करण्यात येणार असल्याचे म्हटले होते. शिवाय; सदर बांधकाम थांबविण्यात आले असून त्या संदर्भातील छायाचित्र न्यायालयात सादर करण्यात आलेली होती. परंतु संपूर्ण प्रकरणाचे आकलन करता सदर बांधकाम मालकीच्या जागेवर असले तरी ते पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

29 फेब्रुवारी 2025 रोजीच्या सूचनेची अंमलबजावणी करून बेकायदेशीर-अनधिकृत बांधकाम पाडण्याचे आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत वेबसाइटवर सध्याचा आदेश अपलोड केल्यापासून तीन आठवड्यांच्या आत एमआरटीपी कायदा, 1966 च्या कलम 52 अंतर्गत सर्व संबंधित कारवाई करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. शिवाय; बेकायदेशीर बांधकाम रोखण्यात न आल्याबद्दल जबाबदार सर्व दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध योग्य कारवाई करण्याचे आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत वेबसाइटवर सध्याचा आदेश अपलोड केल्यापासून सहा महिन्यांच्या आत या न्यायालयात अनुपालन अहवाल दाखल करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. नियोजन मंजुरीशिवाय धाडसीपणे उभारलेल्या बांधकामांना प्रोत्साहन दिले जाऊ शकत नाही. अशा पद्धतीचे उल्लंघन न्यायालयांच्या निदर्शनास आणून दिले गेल्यास सक्षमतेने ते रोखले पाहिज, असे न्यायालयाने म्हटले आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणाचा वापर बेकायदेशीर-अनधिकृत बांधकामांविरुद्ध कारवाईचे रक्षण करण्यासाठी ढाल म्हणून केला जाऊ शकत नाही. बेकायदेशीर बांधकामांच्या प्रकरणांवर कारवाई करताना उच्च न्यायालयांनी कठोर दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे आणि सक्षम प्राधिकरणाच्या आवश्यक परवानग्यांशिवाय उभारलेल्या इमारतींचे न्यायालयीन नियमितीकरण करण्यात स्वतःला गुंतवू नये, अशा न्यायालयाच्या सूचना आहेत.

वसई-विरार महापालिकेच्या क्षेपणभूमी व सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्राच्या आरक्षित जागांवर तब्बल 41 अनधिकृत इमारती बनविण्यात आल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर वसई-विरार महापालिकेने ऑक्टोबर 2024 मध्ये या इमारतींवर निष्कासन कारवाई केली होती. या निर्णयातही न्यायालयाने अधिकाऱ्यांना दोषी ठरविले होते. या अनधिकृत बांधकामांतून आर्थिक हित साधल्याने नगररचना उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्याविरोधात ईडीने नुकतीच कारवाई केली होती.

या सगळ्या नाट्यमय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने वसईतील अनधिकृत बांधकामांत दिलेला निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या निर्णयावर वसई-विरार महापालिका सहाय्यक आयुक्त मनोज वनमाळी व उपायुक्त अजीत मुठे यांच्याविरोधात कारवाई करते; की न्यायालयाच्या आदेशांचा अवमान करते? याकडे वसई-विरारकरांचे लक्ष राहणार आहे.

# डम्पिंग ग्राउंडमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात



इभाडपाडा परिसरातील डम्पिंगमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना वारंवार कळवूनही दुर्लक्ष करत आहेत. उद्या एखादा जीव गेला, तर त्याची पूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल.

**- दिपेश यशवंत इभाड, इभाडपाडा, तलासरी**

नगरपंचायतीकडे सध्या घनकचरा प्रक्रियेसाठी जागेचा अभाव असल्याने, ठेकेदाराकडून तात्पुरत्या स्वरूपात खाजगी जागेचा वापर करण्यात येत आहे. मात्र, या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी तहसिलदारांकडे शासकीय जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तहसिलदारांनी काही शासकीय सर्वे नंबर सूचित केले असून, त्या जागा मिळवण्यासाठी नगरपंचायतीचे प्रयत्न सुरू आहेत.

**- संतोष वावरे, स्वच्छता निरीक्षक, नगरपंचायत, तलासरी**

**डहाणू, दि. २१ : प्रतिनिधी**

तलासरी तालुक्यातील इभाडपाडा गावाजवळ नगरपंचायतीकडून साठवून ठेवण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर संकट ओढवल्याची तक्रार ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून या परिसरात नगरपंचायतीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कचरा साठवला जात असल्याने संपूर्ण परिसरात दुर्गंधीचे वातावरण, अस्वच्छता, डासांची उत्पत्ती आणि आजारांचा फैलाव सुरू आहे. ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याने संतप्त ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. इभाडपाडा येथील अनेक नागरिकांनी या समस्येवर तहसील कार्यालय व नगरपंचायत यांच्याकडे लेखी तक्रारी दाखल करत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, आजतागायत प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याची खंत ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात संताप वाढत असून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. याठिकाणी ठेकेदाराकडून तयार करण्यात आलेल्या डम्पिंग ग्राउंडमुळे परिसरात साचलेले व वाहून जाणारे घाणपाणी, कुजलेला कचरा आणि त्यातून निर्माण होणारे रोगकारक जीवाणू यामुळे लहान मुले, महिलावर्ग व वृद्धांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नागरिकांध्ये डेंग्यू, त्वचारोग तसेच श्वसनाचे त्रास सुरू झाल्याचे सांगण्यात येत आहे. यातून दिवसेंदिवस आजारी पडणाऱ्यांची संख्यासुद्धा वाढत असल्याची माहिती समोर आली आहे. या परिस्थितीमुळे वैद्यकीय उपचार घेत असलेल्या रुग्णांची स्थिती अधिक चिंताजनक होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या गंभीर समस्येबाबत प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कारवाई न झाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविषयी तीव्र नाराजी पसरली आहे. आमच्या जीवाशी खेळ चाललाय आणि प्रशासन मात्र डोळेझाक करत आहे, अशा शब्दांत स्थानिकांनी संतप्त भावना व्यक्त केल्या आहेत. स्थानिक स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने या डम्पिंग ग्राउंडला तात्काळ बंद करून दुसऱ्या पर्यायी ठिकाणी हलवण्यात यावे, अशी ठाम मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. याप्रश्नी जर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय न घेतला, तर ग्रामस्थांनी जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

# दोन महिन्यांनी चोर पोलिसांच्या जाळ्यात

**तलासरी, दि. २१ : प्रतिनिधी**



तलासरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत २० एप्रिल २०२५ रोजी घडलेल्या जबरी चोरीप्रकरणी फरार असलेला आरोपी समीर महादेव जाधव (वय ३०, रा. पुणे) याला अखेर पालघर पोलिसांनी अटक केली आहे. दोन महिन्यांच्या कसोशीच्या तपासानंतर ही कारवाई करण्यात आली असून, पोलिसांनी मोठे यश मिळवले आहे.

या प्रकरणातील फिर्यादी संदीप भैयालाल पारधी हे त्यांच्या स्विफ्ट डिझायर या कारने जात असताना उपलाट-कलबटपाडा परिसरात तिघा अज्ञात इसमांनी त्यांच्या कारसमोर मोटारसायकल अडवून त्यांच्या अपहरणाचा कट रचला होता. समीर जाधव यांना जबरदस्तीने कारच्या मागील सीटवर बसवून, त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी, अंगठी आणि रोख रक्कम मिळून लाखो रुपयांचा ऐवज लुटून त्यांना कल्याण बायपासजवळ सोडून देण्यात आले होते.

याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गंभीर गुन्ह्यातील एक आरोपी विशाल दत्तात्रय तांदळे (वय २९) याला काही दिवसांपूर्वी अटक करून त्याच्याकडून ५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. मात्र प्रमुख आरोपी समीर जाधव हा अद्याप फरार होता. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी पुणे जिल्ह्यातील मंचर येथून समीर जाधवला ताब्यात घेतले.

समीर जाधव याच्यावर यापूर्वीही खून, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे असे एकूण १० गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. ही यशस्वी कारवाई पालघरचे पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अंकिता कणसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अजय गोरड, पोलीस उपनिरीक्षक अमोल चिंधे, पोलीस नाईक महेश बोरसा आणि पोलीस अंमलदार योगेश मुंढे यांनी केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल चिंधे करत आहेत.

# आदिवासींच्या पोटी जन्म हा आमचा गुन्हा झाला काय ? सोयी सुविधांपासून वंचित गावकऱ्यांचा सवाल

**वाडा, दि. २१ : प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील अनेक गाव-पाड्यात स्वातंत्र्यानंतरही नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. नांदणी अंबरभुई ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या बामण शेत गावातील आदिवासी बांधवांना गावात जाण्यासाठी रस्ता नाही. त्यामुळे त्यांना चिखल तुडवत पायवाटेने जावे लागते. पाण्याचीही समस्या आहे. वीज आहे परंतु असून नसल्यासारखी असल्याने आम्ही आदिवासींच्या पोटी जन्म घेतला आणि तोही दुर्गम भागात घेतला हा आमचा गुन्हा झाला काय?, असा संतप्त सवाल या गावातील आदिवासींकडून सरकारला विचारला जात आहे.

बामण शेत गाव घनदाट जंगलात डोंगर माथ्यावर आहे. साधारणपणे 35 ते 40 घरांची लोकवस्ती असून या गावची लोकसंख्या 200 च्या आसपास आहे. निवडणूकीच्या काळात लोकप्रतिनिधी व त्यांचे कार्यकर्ते जंगलवाट तुडवत पायवाटेने मतांचा जोगवा मागण्यासाठी येथे येत असतात. त्यानंतर मात्र येथे ढुंकूनही पाहत नसल्याची खंत येथील आदिवासी व्यक्त करत आहेत.

महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी या गावात तातडीने रस्ता करण्यात यावा, असे सार्वजनिक बांधकाम विभागाला आदेश दिले होते. परंतु त्यालाही प्रशासनाने केराची टोपली दाखवली. या गावातील आदिवासी बांधवांनी प्रशासनाकडे अनेकदा हेलपाटे मारले. पण काही त्यांच्या प्रयत्नाला यश आले नाही. त्यामुळे सध्या तरी या गावात जायला रस्ताच नसल्यामुळे येथील आदिवासी नागरिकांना चिखल तुडवत पायवाटेने जावे लागते. येथील आदिवासी कुटुंबे मूलभूत सुविधांसाठी झगडत आहेत. शिक्षणाची रोजगाराची सुविधा नसल्याने पाच किलोमीटर रोजची पायपीट करावी लागते. त्यामुळे रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करावे लागत आहे. या गावाच्या परिसरात घनदाट जंगल असल्याने सर्पदंश होण्याचे प्रमाण जास्त आहे. शिवाय रुग्ण, वृद्ध व गर्भवती महिला यांना डोली करूनच पाच किमी अंतरापर्यंत न्यावे लागते. येथील आदिवासींना पावसाला सुरू होण्याआधीच तीन महिने लागणारी शिदोरीची साठवणूक करून ठेवावी लागते. पावसाला सुरुवात झाली की सततचे जाणे येणे होत नाही . पावसाळ्यात रुग्णांची गैरसोय होते. विद्यार्थ्यांचेही शैक्षणिक नुकसान होत असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्या शैला घाटाल यांनी दिली. स्वातंत्र्यानंतरही या गावातील आदिवासी बांधवांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# बिबट्याच्या दहशतीने मजूर मिळेनात; शेती कामांवर परिणाम

**डहाणू, दि. २१ : प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यात चिखले काकरपाडा परिसरात बिबट्याचे ठसे आढळल्यामुळे या भागात त्याचा वावर असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे गेल्या आठवड्यापासून परिसरात गस्त सुरू आहे. आजच्या घडलेल्या घटनेच्या परिसरात ट्रॅप कॅमेरे बसवण्यात आले आहेत. गावात जनजागृतीही सुरू असून, मजुरांनी शेतीच्या कामासाठी जाताना एकटे न जाता समूहाने जावे. तसेच, पालकांनी लहान मुलांवर विशेष लक्ष ठेवावे. अशा सूचना वनविभागाकडून देण्यात आल्या आहेत.

**- सारणीकर, वन परिक्षेत्र अधिकारी, बोर्डी वन विभाग**

डहाणूमध्ये बिबट्याच्या वावरण्याने पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी सकाळी चिखले काकरपाडा येथे बिबट्याने रवी खाचे यांच्या घराशेजारी बांधलेल्या दोन बकऱ्यांवर हल्ला केला. या हल्ल्यात बिबट्याने एका बकरीला ठार केले तर एकाला सोबत नेल्याची माहिती मिळाली आहे. घटनास्थळी बिबट्याच्या पायांचे ठसेही आढळून आले आहेत. शिवाय, चिखले परिसरातीलच खाबलपाडा येथे आज सकाळी बिबट्याचे ठसे आढळल्यामुळे संपूर्ण भागात भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेची माहिती ग्रामस्थांनी वनविभागाला दिली. वनविभागाकडून परिसरात गस्त सुरू असून कॅमेरे लावल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली आहे. पंधरा दिवसांपूर्वी मंगळावर, ०८ जुलै रोजी नरपड गावातील कल्पेश पाटील यांच्या वाडीतील गोठ्यात बांधलेल्या वासरावर बिबट्याने पहाटे हल्ला करून ठार केले होते. याच रात्री नरपडमधील वाघाया बापा मंदिराजवळ असलेल्या एकवीरा फार्ममध्ये बिबट्याचा मुक्त संचार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. त्याचप्रमाणे, चिखले काकरपाडा परिसरात १५ जुलै रोजी बिबट्याच्या पायाचे ठसे आढळले होते. या सर्व घटना पाहता बिबट्या सध्या शिकारीच्या उद्देशाने या परिसरातील लोकवस्तीमध्ये सतत वावर करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. बिबट्याच्या पाळीव प्राण्यांवरील वारंवार वाढत्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे प्रमाण वाढत चालले आहे.

सध्या ग्रामीण भागात भात शेतीच्या कामांना गती मिळालेली आहे. गरीब मजूरवर्ग आपल्या उदरनिर्वाहासाठी सकाळी लवकर शेतीकामासाठी निघतो. मात्र, बिबट्याच्या मुक्त संचारामुळे भीतीपोटी मजूर कामावर जाण्यास टाळाटाळ करत असून अनेकांनी शेतात जाणे बंद केले आहे. याचा थेट परिणाम उदरनिर्वाहावर व भातशेती लागवडीच्या कामावर होत आहे. मजुरांच्या अनुपस्थितीमुळे शेतकरीही हतबल झाले असून, वेळेवर लागवड न झाल्यास उत्पन्नावर विपरित परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ज्यामुळे शेतकरी व मजुरांमध्ये संतापाचे वातावरण आहे. बिबट्याच्या वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर वनविभागाने ठोस पावले उचलावीत अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

बिबट्याच्या हल्ल्यात मृत झालेल्या पाळीव प्राण्यांच्या मालकांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, तसेच बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांतून केली जात आहे. डहाणू तालुक्यातील चिखले, खाबलपाडा, नरपड, आंबेमोरा, कंक्राडी आदी भागांमध्ये बिबट्याचा वाढता वावर हे एक गंभीर संकट बनले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शेतीच्या कामांना गती देण्यासाठी प्रशासनाने आणि वनविभागाने तातडीने पावले उचलावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३

Email:panvelcorporation@gmail.com

वेबसाईट: www.panvelcorporation.com




जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र. ३४०/३५०/२०२५ दिनांक: २१/०७/२०२५

### ई- निविदा सुचना
### मलनि:स्सारण विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब- १ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. (GST सोडुन) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पमपा/मल/०३ /२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल मधील वाल्मीकी नगर येथे सामाजिक सभागृह बांधणे. (मा. आमदार श्री. विक्रांत पाटील यांच्या आमदार निधीतुन सन २०२४-२५) | १२,०८,८९१/- | १२,१००/- | ५९०/- |
| २ | पमपा/मल/१२ /२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली सेक्टर-५E येथील न्यू इंग्लिश स्कूल समोर पेव्हर ब्लॉक बसविणे. (मा.आमदार श्री. विक्रांत पाटील यांच्या आमदार निधीतुन सन २०२४-२५) | १५,५८,८४३/- | १५,६००/- | ५९०/- |
| ३ | पमपा/मल/०६ /२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील गणेश छाया सोसायटीच्या समोरील उद्यानात योगसाधना करीता योगमंच/व्यासपीठ तयार करणे व उद्यानामध्ये विद्युत रोषणाई करणे. (मा. आमदार श्री. विक्रांत पाटील यांच्या आमदार निधीतुन सन २०२४-२५) | १६,३२,२३६/- | १६,४००/- | ५९०/- |
| ४ | पमपा/मल/०५ /२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील गार्डन हॉटेल सिग्नल जवळ एस.टी. निवारा शेड तयार करणे. (मा.आमदार श्री. विक्रांत पाटील यांच्या आमदार निधीतुन सन २०२४-२५) | २२,९०,९७३/- | २३,०००/- | ५९०/- |
| | पमपा/मल/०४ /२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील नंदनवन सोसायटीच्या समोरील मोकळ्या जागेत धावन मार्ग तयार करणे. (मा. आमदार श्री. विक्रांत पाटील यांच्या आमदार निधीतुन सन २०२४-२५) | १६,२६,९१०/- | १६,३००/- | ५९०/- |

या निविदे बाबतची विस्तृत माहिती https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

सही/-
उप आयुक्त- (I)
पनवेल महानगरपालिका

जा.क्र/पमपा/मल.वि/३८२५/प्र.क्र.१३,२१,२२,२६,३१/१०३७/२०२५
दिनांक- २१/०७/२०२५

# गर्भाशय मुख कर्करोगाशी झुंजणाऱ्या तरुण महिलेचे वाचविले प्राण

**नागपूर, २१ जुलै :** वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी दुसऱ्या स्टेजवरील गर्भाशय मुख कर्करोगाच्या निदानानंतर एक्स्टर्नल बीम रेडिएशन उपचार करूनही कर्करोग शिल्लक राहिल्याने मृत्यूशी झुंजणाऱ्या महिलेवर जटील उपचार करीत रेडिएशन आणि सर्जिकल ऑन्कॉलॉजिस्ट टीमने तिची मरणाच्या दारातून सहीसलामत सुटका केली.

वर्धा जिल्ह्यातल्या सावंगी येथील जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटमधील डॉ. तेजश्री तेलखडे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. आशिष उके, डॉ. अनुराग लुहारिया (मेडिकल फिजिसिस्ट) डॉ. भूषण जाजू, डॉ. तनू प्रधान, डॉ. आदित्य पटेल (सर्जिकल ऑन्कॉलॉजिस्ट), रेडिओथेरेपी परिचारिका आरती कांबळे यांच्या टीमने ही जटील आणि इंट्राकॅविटरी ब्रेकिथेरेपी यशस्वी केली.

उज्ज्वला (नाव बदललेले) असे गर्भाशय मुखाच्या दुसऱ्या स्टेजवरील कर्करोगाशी झुंजणाऱ्या महिलेचे नाव आहे. अवघ्या ३६ शीत कर्करोगाशी झुंजणारी ही तरुण महिला चंद्रपूर जिल्ह्यातील रहिवासी आहे. गर्भाशय मुखाचा दुसऱ्या स्टेजवरील कर्करोगाचे निदान झालेल्या उज्ज्वला या असह्य वेदनेशी झुंज देत होत्या. नातेवाईकांनी त्यांना सावंगी येथील जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजशी संलग्न सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी भरती केले.

डॉ. तेलखडे यांनी तिच्या चाचण्या केल्या असता, उज्ज्वला यांना गर्भाशय मुखाचा दुसऱ्या स्टेजवरील कॅन्सर असल्याचे निदान करण्यात आले. त्यांची कर्करोगाची गाठ ६ से. मी. आकाराची होती. या गाठीवर एक्स्टर्नल बीम रेडिएशन प्रभाव होऊन सुद्धा गर्भाशय मुखावर ३ से. मी. ची गाठ शिल्लक होती. बाह्य विकिरण उपचारानंतर (एक्स्टर्नल बीम रेडिएशन) इतकी मोठी गाठ शिल्लक राहणे, ही दुर्मिळ स्थिती मानली जाते. या गाठीमुळे इंट्राकॅविटरी ब्रेकिथेरेपी म्हणजेच आंतरगर्भाशय विकिरण उपचार करणे अवघड होणार होते.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखत डॉ. तेजश्री तेलखडे यांनी त्वरीत सर्जिकल ऑन्कॉलॉजी टीमशी संपर्क साधला. त्यानुसार डॉ. भूषण जाजू, डॉ. तनू प्रधान, डॉ. आदित्य पटेल यांनी आधी शस्त्रक्रिया करून गर्भाशय मुखावरील गाठ शक्य तितक्या प्रमाणात बाहेर काढली. त्यानंतर डॉ. तेजश्री तेलखडे आणि डॉ. आशिष उके यांनी यशस्वीरित्या इंट्राकॅविटरी ब्रेकिथेरेपी करून शिल्लक राहिलेल्या गाठीला हायडोस रेडिएशन देऊन ही गाठ पूर्णतः बरी केली.

डॉ. तेजश्री तेलखडे यांनी रुग्णाच्या कर्करोगाचे त्वरीत निदान करीत त्यांच्या तज्ज्ञ सहकाऱ्यांनी अल्पावधित अत्याधुनिक उपचार प्रणाली वापरत हा जटिल कर्करोग पूर्णतः बरा केल्यामुळे अकाली मृत्यूच्या दारात पोचलेल्या या तरुण महिलेला सहीसलामत परत आणले. उपचार झाल्याच्या सहा महिन्यांनंतर या महिलेची पुन्हा (पीईटी- सीटी, एमआरआय- पेल्विस) तपासणी केली असता, तिला आता कर्करोगाची कोणतीही लक्षणे नसल्याचे दिसून आले.

# अभिषेक मलिकने शेअर केले त्याचे ऑन-द-गो फिटनेस हॅक्स



**मुंबई, २१ जुलै :** झी टीव्हीवरील जमाई नंबर १ ही मालिका तिच्या रोचक कथानकामुळे आणि करिष्मादायक पात्रांमुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. या मालिकेमध्ये मुख्य भूमिका नील साकारणारा अभिनेता अभिषेक मलिक परिपूर्णपणे आकर्षकपणा आणि जबाबदारी यांच्यातील समतोल साधत आहे. पडद्यावर प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा अभिषेक, पडद्यामागेही व्यस्त शूटिंग शेड्यूल असूनही आपल्या आरोग्य आणि फिटनेसबद्दल तितकाच समर्पित आहे.

शूटिंगचे सततचे सीन आणि दीर्घ तासांच्या वेळापत्रकात फिटनेससाठी वेळ काढणे अनेकांसाठी कठीण वाटते. पण अभिषेक आपल्या धावपळीच्या दिवसांतही सक्रिय राहण्याच्या शिस्तीत अडथळा येऊ देत नाही. तो सेटवरील कोणत्याही मोकळ्या जागेला स्वतःच्या वर्कआउट स्पेसमध्ये रूपांतरित करतो. मेकअप रूममध्ये रेसिस्टन्स बँडने वर्कआउट करणे असो, सीनच्या बदलाच्या दरम्यान कोअर एक्सरसाईज करणे, किंवा दोन टेक्समधल्या वेळेत थोडा वॉक घेणे अशाप्रकारे अभिषेक सतत हालचाल करत राहतो. तो आपल्या शिस्तीचे श्रेय 'माइंडफुल' म्हणजे जागरूक खाण्यालाही देतो. शूटिंग दरम्यान ब्रेकमध्ये तो नेहमी घरचे साधे आणि सोपे जेवण पसंत करतो. साखरयुक्त स्नॅक्स टाळून, तो प्रोटीन बार्स, फळे आणि भरपूर पाणी घेणे पसंत करतो.

अभिषेक म्हणाला, फिटनेस मला संतुलित ठेवतो, विशेषतः जेव्हा शूटिंगचे दिवस खूप लांबतात किंवा अनपेक्षित असतात. मला प्रत्येक वेळी जिमसाठी वेळ मिळत नाही, पण मी सतत हालचाल करत राहतो जरी तो फक्त १५ मिनिटांचा सेटवरील वॉक असो, शॉट्समधून ब्रेक घेत स्ट्रेचिंग असो, पायऱ्या चढणे असो किंवा स्टेप-अप एक्सरसाईज. अनेक वेळा मी सेटवर जे काही सापडेल त्याचा वापर करतो. उदा. स्क्वॉट्ससाठी खुर्ची, पुश-अप्ससाठी भिंत. फिटनेस म्हणजे केवळ सिक्स-पॅक ॲकब्स नव्हे तर सतत सक्रिय राहणे, ताजेतवाने वाटणे, आणि शरीर व मनाची काळजी घेणे. धावपळीच्या दिवसात या छोट्या सवयी खूप मोठा बदल घडवून आणतात.

अभिषेकचा फिटनेसबाबतचा दृष्टिकोन सोपा पण प्रभावी आहे खूप काही करण्यापेक्षा दररोज थोडे तरी काहीतरी करणे अधिक महत्त्वाचे आहे. आगामी भागांमध्ये प्रेक्षकांना पाहायला मिळेल की नील कशा पद्धतीने कांचनचे (पापिया सेनगुप्ता) खरे रूप समोर आणण्याचा प्रयत्न करतो. पण तो यशस्वी होईल का? की कांचन पुन्हा एकदा तिच्या धूर्त डावांनी त्याला फसवेल?

# सॅमसंग इंडियाने गॅलॅक्सी वॉच८ सिरीजच्या प्री-ऑर्डरला सुरूवात केली



**मुंबई, २१ जुलै :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्सफ ब्रँडने आज गॅलॅक्सी वॉच८ आणि गॅलॅक्सी वॉच८ क्लासिक लाँच केले, ज्यानसह संपूर्ण गॅलॅक्सी वॉच लाइनअपमध्ये प्रख्यात डिझाइन ओळख स्थापित केली आहे. गॅलॅक्सी वॉच अल्ट्राच्या, कुशन डिझाइनच्यां पायाला अधिक दृढ करत या सिरीजमध्ये आतापर्यंतचे सर्वात सडपातळ गॅलॅक्सी वॉच आहेत. या लाँचचा भाग म्हणून सॅमसंग आकर्षक सुरूवातीच्या किमती आणि विशेष प्री-ऑर्डर फायदे देत आहे. गॅलॅक्सी वॉच८ ४० मिमी बीटीची किंमत ३२,९९९ रूपये आहे, तर ४० मिमी एलटीई व्हर्जन ३६,९९९ रूपयांमध्ये उपलब्ध आहे. मोठे ४४ मिमी बीटी व एलटीई व्हेआरिएण्ट्सची किंमत अनुक्रमे ३५,९९९ रूपये आणि ३९,९९९ रूपये आहे. गॅलॅक्सी वॉच८ क्लासिक ४७ मिमी बीटी मॉडेलची किंमत ४९,९९९ रूपये आहे, तर एलटीई व्हेलरिएण्ट ५०,९९९ रूपयांमध्ये उपलब्धि आहे. ९ जुलै ते २४ जुलै २०२५ दरम्यान गॅलॅक्सी वॉच८ सिरीज प्री-बुक करणारे ग्राहक उत्साहवर्धक फायद्यांचा आनंद घेऊ शकतात, जसे जवळपास १२,००० रूपयांपर्यंत मल्टी-बँक कॅशबॅक किंवा अपग्रेड बोनस किंवा जवळपास १५,००० रूपयांपर्यंत मल्टी-बाय ऑफर्स, ज्या विशेषत: नवीन गॅलॅक्सी एस व झेड सिरीज ग्राहकांसाठी डिझाइन करण्यातत आल्या आहेत. तसेच, ग्राहक आघाडीच्या बँका आणि एनबीएफसींकडून जवळपास १८ महिन्यांसाठी नो-कॉस्ट ईएमआय पर्यायांचा आनंद घेऊ शकतात.

# डॉ. धनंजय दातार यांच्यातर्फे फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट

**नागपूर, २१ जुलै :** करोनाची प्राणघातक साथ मानवजातीला खूप काही शिकवून गेलीय. शरीराचे तापमान, रक्तदाब, रक्तशर्करेचे प्रमाण, हृदयाचे ठोके याप्रमाणेच आजकाल श्वासोच्छवासातील प्राणवायूच्या (ऑक्सिजन) पातळीवरही काटेकोर लक्ष ठेवणे गरजेचे बनले आहे. फुफ्फुसांच्या आजारांनी दुर्बळ रुग्णांसाठी शुद्ध प्राणवायूचा तत्काळ पुरवठा अत्यंत मोलाचा ठरत आहे आणि एका श्वासाची किंमत जगाला आता उमगू लागली आहे.

प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटरच्या वतीने श्वसन संस्थेचे आरोग्य आणि प्राणवायूचे महत्त्व अधोरेखित करणारा एक कार्यक्रम नुकताच गोरेगावमध्ये आयोजित करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांना मदतीचा हात देणारे सुप्रसिद्ध उद्योजक मसालाकिंग डॉ.धनंजय दातार या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. फुफ्फुसाच्या विकाराने ग्रस्त, परंतु आर्थिक असहाय्यतेमुळे प्राणवायू पुरवठा उपकरणे खरेदी न करु शकणाऱ्या ६ गरजू रुग्णांना दातार यांनी स्वखर्चाने असे उपकरण संच भेट दिले. प्रत्येक संचात घरात हवा तेव्हा प्राणवायू पुरवठा करणारे ५ ते १० लिटर्स क्षमतेचे ऑक्सिजन



कॉन्संट्रेटर या उपकरणांचा समावेश होता. याआधी गेल्या वर्षीही ८ रुग्णांना दातार यांनी अशीच मदत केली आहे.

याप्रसंगी बोलताना डॉ.धनंजय दातार म्हणाले, माझ्या आईच्या अखेरच्या दिवसांत ती फुफ्फुसाच्या आजाराने गलितगात्र झाली होती. श्वासोच्छवासासाठीची तिची धडपड मला बघवत नव्हती. आजही अशा आजारांनी ग्रस्त गरीब रुग्णांचे हाल मला अस्वस्थ करतात. करोना साथीच्या काळात तत्काळ प्राणवायू न मिळाल्याने अथवा वाहनाच्या अनुपलब्धतेमुळे रुग्णालयात वेळेवर पोचू न शकल्याने अनेक रुग्ण दगावले. त्यावर उपाय म्हणून मी व माझ्या समूहाने ऑक्सिजन सिलेंडरने सज्ज रिक्षा ॲम्ब्युलन्स या अभिनव उपक्रमाला आर्थिक पाठबळ पुरवले. गेल्या वर्षी आणि यंदाही पैशाअभावी प्राणवायू उपकरणे खरेदी करु न शकणाऱ्या रुग्णांना आम्ही प्राणवायू संच भेट दिले आहेत आणि यापुढेही गरीब गरजूंना अशीच मदत करत राहणार आहोत.

फुफ्फुसाच्या आजारांनी ग्रस्त रुग्णांच्या पुनर्वसन कार्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या डॉ. पूर्वी देवानी यांनी सूत्रसंचालन केले. प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटरचे संस्थापक चालक डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई व त्यांच्या पत्नी वैशाली प्रभुदेसाई यांनी यावेळी संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

डॉ. प्रभुदेसाई म्हणाले, आयुष्य आरोग्यपूर्ण घालवणे महत्त्वाचे असते आणि त्यासाठीच सर्वांनी आरोग्य, योग्य जीवनशैली व श्वासाचे महत्त्व ओळखणे गरजेचे आहे. सकारात्मक दृष्टीकोण, योग्य उपचार, नियमित व्यायाम या जोरावर फुफ्फुसाच्या आजारांचे रुग्ण सर्वसाधारण आयुष्य जगू शकतात. आम्ही अशा रुग्णांचे समुपदेशन तथा यशस्वी पुनर्वसन करुन त्यांना आनंदी जीवन जगायला शिकवतो.

# जीएनजी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडची प्राथमिक समभाग विक्री

**नागपूर, २१ जुलै :** जीएनजी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (कंपनी) ची इक्विटी शेअर्ससाठीची प्राथमिक समभाग विक्री (आयपीओ) बुधवार, २३ जुलै २०२५ रोजी खुली होणार आहे. प्रमुख गुंतवणूकदार बोली दिनांक हा बोली / प्रस्ताव सुरू होण्याच्या एक कार्यदिवस आधी मंगळवार, २२ जुलै २०२५ रोजी ठेवण्यात आला आहे. बोली /प्रस्ताव बंद होण्याचा दिनांक शुक्रवार, २५ जुलै २०२५ आहे.

ही ऑफर एससीआरआर १९५७ च्या नियम १९(२)(ब) आणि सेबी आयसीडीआर नियम ३१ च्या अनुषंगाने केली जात आहे. ही ऑफर बुक बिल्डिंग प्रक्रियेच्या माध्यमातून केली जात असून, सेबी आयसीडीआर सुधारित २०१८ नियम ६(१) च्या नियमनात आहे. त्या अंतर्गत सेबी आयसीडीआर नियमांनुसार, ऑफरच्या ५०% पेक्षा जास्त नसलेला भाग पात्र संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी (क्यूआयबी आणि तो हिस्सा क्यूआयबी भाग) प्रमाणबद्ध वाटपासाठी उपलब्ध असेल. तथापि आपली कंपनी, बीआरएलएम सोबत सल्लामसलत करून, सेबी आयसीडीआर नियमांनुसार विवेकाधीन आधारावर क्यूआयबी भाग पैकी ६०% पर्यंत हिस्सा प्रमुख गुंतवणूकदारांसाठी वाटप करू शकते. त्यापैकी किमान एक तृतीयांश हिस्सा देशांतर्गत स्थानिक म्युच्युअल फंडांसाठी उपलब्ध राहील. त्यासाठी स्थानिक म्युच्युअल फंडांकडून प्रमुख गुंतवणूकदार वाटप किंमतीच्या बरोबरीने किंवा त्यापेक्षा जास्त किंमतीसाठी वैध बोली प्राप्त व्हायला लागतील. जर प्रमुख गुंतवणूकदार भागामध्ये कमी सदस्यता किंवा वाटप न झाल्यास, उर्वरित इक्विटी शेअर्स नेट क्यूआयबी भाग मध्ये समाविष्ट केले जातील.



ऑफर प्राईस इतक्या किंवा त्याहून अधिक किमतीला बोली मिळाल्यास क्यूआयबी च्या एकूण हिश्शापैकी ५ % फक्त म्युच्युअल फंडांना वाटपासाठी उपलब्ध असतील आणि क्यूआयबीचा उर्वरित हिस्सा म्युच्युअल फंडांसह अन्य सर्व क्यूआयबी बोलीधारकांसाठी उपलब्ध करून दिला जाईल. उर्वरित नेट क्यूआयबी हिस्सा सर्व क्यूआयबी गुंतवणूकदारांसाठी (म्युच्युअल फंडसह) प्रमाणानुसार वाटपासाठी उपलब्ध असेल. त्यासाठी वैध बोली ऑफर प्राईस इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त दराने प्राप्त झाल्या पाहिजेत. तसेच, ऑफरच्या १५ टक्क्यांपेक्षा कमी नसलेला हिस्सा बिगर संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध असेल. त्यापैकी बिगर संस्थात्मक हिस्स्याचा एक तृतीयांश भाग ०.२० दशलक्ष रु. पेक्षा जास्त आणि १.०० दशलक्ष रु. पर्यंत अर्ज आकार असलेल्या अर्जदारांसाठी राखीव असेल आणि दोन तृतीयांश भाग १.०० दशलक्ष रु.पेक्षा अधिक अर्ज आकार असलेल्या अर्जदारांसाठी राखीव असेल. अर्थात त्यासाठी सेबी आयसीडीआर निर्देशांनुसार वर नमूद केलेल्या कोणत्याही उप-श्रेणीतील सबस्क्राईब नसलेला भाग दुसऱ्या इतर उप-श्रेणीतील गुंतवणूकदारांना वाटप केलेला असू शकतो. ऑफर प्राईस इतक्या किंवा त्याहून अधिक किमतीला बोली मिळाल्यास हे लागू होईल. ऑफर प्राइस इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या बोलीवर हे लागू असेल.

पुढे, सेबी आयसीडीआर निर्देशांनुसार ऑफरच्या ३५ % पेक्षा कमी नसलेला भाग रिटेल वैयक्तिक गुंतवणूकदारांना उपलब्ध होईल. ऑफर प्राइस इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या बोलीवर हे लागू असेल. प्रमुख गुंतवणूकदारांखेरीज सर्व संभाव्य गुंतवणूकदारांनी आपापल्या एएसबीए खात्यांचा तपशील आणि यूपीआय अर्जदारांसाठी यूपीआय आयडीसह जाहीर करून अर्जाची विहित रक्कम ॲप्लीकेशन सपोर्टेड बाय ब्लॉक अमाऊंट (एएसबीए) प्रक्रियेद्वारे करून ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार योजनेत सहभागी करून घेण्यासाठी सर्व बोली रकमा या सेल्फ सर्टिफाइड सिंडिकेट बँक्स एससीएसबीतर्फे किंवा यूपीआय यंत्रणे अंतर्गत स्पॉन्सर बँकेतर्फे ब्लॉक करून ठेवण्यात येतील. प्रमुख गुंतवणूकदारांना त्यांच्यासाठीच्या हिश्शात एएसबीए प्रक्रीयेनुसार सहभागी होण्याची परवानगी नाही.

ऑफरच्या १५ टक्क्यांपेक्षा जास्त नसलेला हिस्सा बिगर संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध असेल. त्यापैकी (अ) एक तृतीयांश भाग २००,००० रु. पेक्षा जास्त आणि १,०००,००० रु. पर्यंत अर्ज आकार असलेल्या अर्जदारांसाठी राखीव असेल आणि (ब) दोन तृतीयांश भाग १.०० दशलक्ष रु.पेक्षा अधिक अर्ज आकार असलेल्या अर्जदारांसाठी राखीव असेल. अर्थात त्यासाठी सेबी आयसीडीआर निर्देशांनुसार वर नमूद केलेल्या कोणत्याही उप-श्रेणीतील सबस्क्राईब नसलेला भाग दुसऱ्या इतर उप-श्रेणीतील गुंतवणूकदारांना वाटप केलेला असू शकतो. ऑफर प्राईस इतक्या किंवा त्याहून अधिक किमतीला बोली मिळाल्यास हे लागू होईल

# सिल्व्हरटन इंडस्ट्रीज लिमिटेडने सेबीकडे दाखल केला डीआरएचपी

**नागपूर, २१ जुलै :** सिल्व्हरटन इंडस्ट्रीज लिमिटेड ही खास पर्यावरणपूरक कागदाचे उत्पादन आणि विपणन करणारी कंपनी असून, आपल्या एकत्रित कार्यपद्धतीच्या माध्यमातून ती विविध क्षेत्रांतील उद्योगांना कागद पुरविते. लेखन व मुद्रणासाठीचा कागद, क्राफ्ट पेपर, कपस्टॉक पेपर तसेच इतर विशेष दर्जाचे कागद यांचे उत्पादन ही कंपनी करते. किरकोळ व्यापार, कॉर्पोरेट, शैक्षणिक आणि सरकारी क्षेत्रांमध्ये या उत्पादनांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. तसेच, पॅकेजिंग, एफएमसीजी, दुय्यम पॅकेजिंग, जलद सेवा देणाऱ्या रेस्टॉरंट्ससाठी अन्न व पेय पदार्थांचे पॅकेजिंग, द्रव पॅकेजिंग, लेबल आणि स्टेशनरी उत्पादने, तसेच औषध उद्योगासाठीचे पॅकेजिंग यांमध्येही ही उत्पादने उपयुक्त ठरतात.

सिल्व्हरटन इंडस्ट्रीज लिमिटेडने सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) या संस्थेकडे आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) सादर केला आहे. कंपनीने प्राथमिक समभाग विक्रीच्या (आयपीओ) माध्यमातून निधी उभारण्याची योजना आखली आहे. या आयपीओमध्ये ५ रुपये दर्शनी मूल्य असलेल्या समभागांचा समावेश असून, त्याअंतर्गत एकूण ३०० कोटींच्या नव्या समभागांची (फ्रेश इश्शू) विक्री केली जाणार आहे. यासोबतच विद्यमान समभागधारकांकडील ३ कोटी २२ लाख समभागांची (ऑफर फॉर सेल) विक्रीदेखील करण्यात येणार आहे.

या समभाग विक्रीतून मिळणारा निधी काही विशिष्ट उद्दिष्टांसाठी वापरण्याचा कंपनीचा प्रस्ताव आहे. सध्याच्या उत्पादन प्रकल्पातच १४ मेगावॅट क्षमतेचा वेस्ट-टू-एनर्जी कॅप्टिव्ह पॉवर प्लँट आणि कंप्रेस्ड बायोगॅस प्लँट उभारून शाश्वत ऊर्जा उपक्रमांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक भांडवली खर्चासाठी अंदाजे १७७.५० कोटींचा निधी कंपनी वापरणार आहे. त्याचप्रमाणे विद्यमान उत्पादन प्रकल्पात रीवाइंडर व शीटर यंत्रणांची क्षमता वाढविण्यासाठी, तसेच आतील गोदामांची उभारणीसाठी भांडवली खर्चाच्या अनुषंगाने सुमारे ३४.६४ कोटींचा निधी वापरला जाणार आहे. कंपनीने घेतलेल्या काही कर्जांची पूर्ण किंवा अंशतः परतफेड वा पूर्वपरतफेड करण्यासाठी सुमारे ७२ कोटी वापरले जातील. याशिवाय उर्वरित रक्कम सामान्य कॉर्पोरेट वापरासाठी राखून ठेवण्यात येणार आहे. हे उल्लेख ऑबजेक्ट ऑफ इश्शूमध्ये नमूद आहेत.

ही समभाग विक्री रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसच्या माध्यमातून करण्यात येत असून, विक्रीस आलेले इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड (बीएसई) आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) या दोन्ही शेअर बाजारांवर सूचीबद्ध करण्याचा कंपनीचा प्रस्ताव आहे.

या इश्यूसाठी पँटोमॅथ कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड हे बुक रनिंग लीड मॅनेजर म्हणून कार्य करीत आहेत.

# अभिनेत्रींनी सांगितले त्यांच्या मेकअप पॅशनबाबत!

**मुंबई, २१ जुलै :** अभिनेत्रींसाठी मेकअप फक्त त्यांच्या कामापुरता मर्यादित नाही, तर मेकअपच्या माध्यमातून त्यान स्वत:ला आणि त्यांच्यापॅशनला व्यक्ता करतात. नवीन शेड्ससह प्रयोग करायचा असो, छान हायलाइटर शोधायचे असो किंवा योग्य न्यूड लिपस्टिक शोधायची असो मेकअप शॉपिंग टास्कपेक्षा उत्साहवर्धक बाब बनली आहे. एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री मेकअपप्रती त्यांचे अविरत प्रेम आणि त्यांच्या कलेक्शनध्ये नवीन प्रोडक्टची भर केल्या शिवाय कशाप्रकारे राहू शकत नाही याबाबत सांगत आहेत. या अभिनेत्री आहेत सोनल पवार (मलायका, हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, भाबीजी घर पर है'). मालिका हप्पू की उलटन पलटन'मध्ये मलायकाची भूमिका साकारणाऱ्या सोनल पवार म्हहणाल्या, प्रामाणिकपणे सांगायचे तर, मी कधीही, कुठेही मेकअपसामग्रीची खरेदी करू शकते. माझ्याकडे पाच ब्लशेस किंवा दहा लिपस्टिक्स असल्या तरी मी खरेदी करते. मला काहीतरी आकर्षक व चांगले उत्पादन दिसले की ते लावून पाहते. मेकअप माझ्यासाठी थेरपीसारखे आहे. मला नवीन रंग व फिनिशेसचा शोध घ्यायला आवडतो. ऑनलाइन ब्राऊजिंग करत असले किंवा स्टोअरमधून सहज चालत असले की मी काहीतरी नवीन खरेदी करते. माझे कलेक्शान वाढत आहे, पण प्रत्येअक उत्पादनामधून नवीन आनंद मिळतो. मला विशेषत: विविध प्रकारे वापरता येणारी उत्पादने आवडतात, जसे टिंट, जे ओठ व गालांवर लावता येते किंवा शिमर, जे डोळ्यांच्या पापण्यांना आकर्षक करते. मी दररोज आकर्षक व किमान लुकला प्राधान्य देते, ज्यासाठी टिंटेड मॉइश्चरायझर, मस्करा व सॉफ्ट लिप टिंटचा वापर करते. या जलद, फ्रेश मेकअपमधून मला उत्साही वाटते. दररोज हेवी मेकअप करण्याची गरज नाही, तर त्यामधून माझे व्यक्तिमत्त्व दिसून येण्याला प्राधान्य देते, तसेच माझ्या मूडनुसार वेगवेगळे लुक्स तयार करते.''


## आज का अंदाज

मंगळवार २२ जुलै २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

**कल्याण बाजार**

| 3 | 6 | 7 | 0 |
|---|---|---|---|
| 139 | 790 | 124 | 127 |
| 256 | 114 | 278 | 280 |
| 689 | 277 | 467 | 569 |
| 32 | 62 | 78 | 08 |
| 34 | 64 | 79 | 09 |
| 34 | 65 | 71 | 01 |

**मुंबई बाजार**

| 4 | 5 | 8 | 9 |
|---|---|---|---|
| 158 | 168 | 189 | 126 |
| 266 | 348 | 378 | 289 |
| 699 | 230 | 224 | 478 |
| 42 | 51 | 86 | 90 |
| 43 | 52 | 87 | 97 |
| 41 | 53 | 80 | 96 |

**२२ जुलै २०२५ सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 20 | 56 | 86 |
| 19 | 29 | 53 | 83 |
| 17 | 27 | 54 | 84 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


# ३० जून रोजी संपलेल्या तिमाहीसाठी एचडीएफसी बँकेचे आर्थिक निकाल

**नागपूर, २१ जुलै :** एचडीएफसी बँक लिमिटेडच्या संचालक मंडळाने शनिवार, १९ जुलै २०२५ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी बँकेचे (भारतीय जीएएपी अनुसार) आर्थिक निकाल मंजूर केले. बँकेच्या या खात्यांचा आढावा बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी 'मर्यादित पुनरावलोकन' अंतर्गत घेतला आहे.

स्वतंत्र आर्थिक निकाल: जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत एचडीएफसी बँकेचे एकूण निव्वळ उत्पन्न ५३१.७ अब्ज इतके झाले, ज्यामध्ये बँकेच्या सहाय्यक कंपनी एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडच्या अलीकडील आयपीओ मध्ये ऑफर फॉर सेलच्या माध्यमातून अंशतः विक्री करून मिळालेला ९१.३ अब्ज रुपयांचा नफा समाविष्ट आहे. मागील वर्षीच्या याच तिमाहीत हे उत्पन्न ४०५.१ अब्ज होते. जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत बँकेचे निव्वळ व्याज उत्पन्न (म्हणजे व्याज उत्पन्नातून व्याज खर्च वजा करून उरलेली रक्कम) ५.४% ने वाढून ३१४.४ अब्ज झाले, जे मागील वर्षीच्या समान तिमाहीत २९८.४ अब्ज होते. एकूण मालमत्तेच्या तुलनेत बँकेचा कोअर निव्वळ व्याज मार्जिन ३.३५% इतका होता. यामध्ये ठेवींपेक्षा मालमत्तांची किंमत अधिक वेगाने वाढल्याचा परिणाम दिसून आला. मागील तिमाही (मार्च ३१, २०२५) मध्ये हा मार्जिन ३.४६% होता.

## राशीभविष्य

**मेष :** आज आरोग्याशी संबंधित कोणतीही गंभीर समस्या येण्याची शक्यता कमी आहे. हवामानाशी संबंधित आजार झाल्यास त्वरित उपचार घ्या. गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांनी आहाराची विशेष काळजी घ्यावी.

**वृषभ :** आज व्यवसायात उत्पन्न कमी आणि खर्च जास्त होईल. स्वत:ची परिस्थिती लक्षात घेऊन पैसे गुंतवण्याचा निर्णय घ्या. वडिलोपार्जित संपत्ती मिळण्यात येणारा अडथळा वरिष्ठ नातेवाईकाच्या मध्यस्थीने दूर होईल.

**मिथुन :** आज प्रेमसंबंधातील तणाव संपुष्टात येईल. परस्पर मतभेद वाढू देऊ नका. एकमेकांचा प्रॉब्लेम समजून घेण्याचा प्रयत्न करा. वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये समन्वयाचा अभाव असू शकतो.

**कर्क :** विवाह करण्याचा विचार करत असतील, तर थोडा आर्थिक बाजूचा विचार करावा. प्रवासाचे योग संभवतात. करिअर आणि वैयक्तिक जीवन यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न कराल.

**सिंह :** आज एखादा मित्र कार्यक्षेत्रात विशेष सहयोगी ठरेल. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. कोणाचीही दिशाभूल करू नका. महत्त्वाच्या कामात बुद्धीचा वापर करून अंतिम निर्णय घ्या. लोभ टाळा.

**कन्या :** आज अशी एखादी घटना घडू शकते ज्यामुळे तुमच्या कामावर परिणाम होईल. सामाजिक कार्याकडे कल वाढेल. कोणाचीही दिशाभूल करू नका. तुमच्या बुद्धीने आणि विवेकाने काम करा.

**तुळ :** या राशीच्या व्यक्तींना आज काहीतरी गुडन्यूज मिळेल. नोकरी करणाजयांना मोठा आर्थिक लाभ होऊ शकतो. मात्र बिझनेस करणाजयांनी खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहेत.

**वृश्चिक :** आज व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. नोकरीत अधीनस्थ लाभदायक ठरतील. घर आणि व्यवसायाच्या जागेच्या सजावटीवर जास्त पैसे खर्च होऊ शकतात.


**धनु :** राग टाळा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. नोकरी करणाजया लोकांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी जास्त लक्ष द्यावे लागेल. पती पत्नीने एकमेकांवरील विश्वास वाढवण्याचा प्रयत्न करावा.

**मकर :** आजचा दिवस उत्तम राहील. बचत करण्यावर लक्ष द्या. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. आज खूप धावपळ होईल. काही कारणामुळे प्रवासाचे योग संभवतात.

**कुंभ :** आपल्या जोडीदारसोबत वेळ घालवावा. जर एखाद्या विषयावर काही अडचणी असतील तर मनमोकळेपणाने संवाद साधा. या आठवड्यात कोणतीही गुंतवणूक करु नका.

**मीन :** आज व्यवसायात चांगले उत्पन्न मिळण्याचे संकेत आहेत. त्यामुळे संचित भांडवली संपत्ती वाढेल. आर्थिक बाबतीत पूर्वी केलेले प्रयत्न यशस्वी होतील. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील.

## शब्दकोडे क्रमांक २१७२



**आडवे शब्द :-**
१) अत्यंत संथ गतीने
६) खून, हत्या
८) शपथ
११) धाड घालणे, लुटणे
१३) आशीर्वादाचा हात
१४) बळकट
१६) उत्सवाचे दिवस
१७) अंत:करण
१८) खोलवर
१९) सदोदित
२१) हद्द
२२) पहारेकरी
२५) बांबू
२६) संपूर्ण
२८) नदीचे तीर
२९) बनकर
३०) कमी बोलणारा
३२) दिवा
३३) पाण्यावरील लाट
३५) गैरसावध
३७) विरी, शक्ती सामर्थ्य
३८) एकटा, खच सिंचन
४०) गव्हाचे पीठ
४१) कैफ मद
४२) एक ऋतू
४३) मोठे डोळे, विद्रूप
४६) पायाचे उभे हाड
४८) एक कडवे धान्य
४९) समुद्रकिनारा
५२) बळ, शक्ती
५४) माळ धारण करणारा
५६) खसखस लावलेला एक गोड पदार्थ
५९) बोबडी वळाल्या नंतरची भाषा
६१) ऋण
६२) च्या बरोबर
६३) श्रम
६४) ओटा, पार
६५) उथळ वाटी
६६) मीन
६८) विरोध, अडथळा
७०) रमापती
७३) तामसी रागीट
७५) वाळवी
७६) दृष्टी
७७) डबके, तट्ट फुगलेला

**उभे शब्द :-**
२) संस्कृत भाषा
३) बदल
४) लोभी
५) बळ, दम, भार
६) हिरव्या विषारी सापाची जात
७) साहित्यातील नऊ भावना
८) पाऊल
९) सोशीक, सोसण्याचा स्वभाव
१०) झकास
१२) महिना
१४) श्रीरामाचे वडील
१५) कट्टर, ठाम मताचा
१८) नेहमी
२०) रामदासस्वामींचा एक ग्रंथ
२३) गोंधळ, मोठा आवाज
२४) शरम
२५) उमलण्यापूर्वीची फुलाची अवस्था
२७) मनाचा ओढा
२९) मागणारा
३०) वजनदार
३१) हाताचा तळवा
३४) गरीब, निर्धन
३६) वस्तू, माल ३७) विसंगती,
३८) साईबाबांचा एक संदेश
३९) छोटा दरवाजा
४४) भरभराट
४५) त्या प्रमाणे
४७) लो टिळकांनी लिहिलेला एक टीका ग्रंथ
५०) बेपता, ठावठिकाणा न लागेल असे
५१) तात्काळ
५३) अरुंद तोंडाची लांब पिशवी
५५) यथाशास्त्र, पद्धतीनुसार
५७) धमनी
५८) आठ
६०) लवकर, चटकन
६३) जनावरांचा घोळका
६७) एक चतुर्थांश भाग
६८) शंकर, प्रत्येक
६९) दालचीनीचे झाड
७१) शोध, तपास
७२) रडकथा
७३) चांदणी
७४) एकाग्र नजर

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर




महासागर



# जनसुरक्षा विधेयकाला मंजुरी देऊ नये

## संघर्ष समितीची राज्यपालांकडे मागणी

**डहाणू, दि. २१ : प्रतिनिधी**



राज्य सरकारच्या वादग्रस्त जनसुरक्षा विधेयकाला मंजुरी देऊ नये, अशी मागणी जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समितीने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णण यांच्याकडे केली आहे. संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने राजभवनात राज्यपालांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनात विधेयकातील त्रुटी, संभाव्य दुरुपयोग आणि लोकशाहीवर होणारा गंडा यावर गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली.

या विधेयकात "अवैध कृती" आणि "अवैध संघटना" अशा महत्त्वाच्या संज्ञा स्पष्टपणे परिभाषित केलेल्या नाहीत. यामुळे कायद्याचा गैरवापर करून निष्पाप आणि निष्कलंक नागरिकांना अटक होण्याचा धोका निर्माण होतो. या संज्ञांच्या धूसरपणामुळे कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना मनमानी करण्याची संधी मिळू शकते, असा इशारा समितीने दिला. या विधेयकावर सुमारे १२ हजार ७०० नागरिकांनी आपले अभिप्राय सरकारकडे सादर केले होते. त्यापैकी तब्बल ९ हजार ५०० नागरिकांनी विधेयक रद्द करण्याची मागणी केली होती. तथापि, सरकारने लोकसुनावणी अथवा खुल्या चर्चेची प्रक्रिया न राबवता केवळ काही किरकोळ बदल करून विधेयक बहुमताच्या जोरावर मंजूर केले. ही प्रक्रिया लोकशाहीच्या तत्त्वांना हरताळ फासणारी असून, जनमताचा अनादर करणारी असल्याचा आरोप समितीने केला.

संघर्ष समितीने विधेयकाविरोधातील आणखी गंभीर बाब मांडली, शांततापूर्ण आंदोलनांवर होणारी संभाव्य दडपशाही, मोर्चे, रास्ता रोको, निषेध यांसारख्या संविधानाने मान्यता दिलेल्या लोकशाही मार्गांनी आवाज उठवणाऱ्या नागरिकांवर या कायद्याचा आधार घेऊन कारवाई होऊ शकते. त्यामुळे हा कायदा लोकविरोधी, संविधानविरोधी असून तो मंजूर होऊ नये, अशी स्पष्ट भूमिका समितीने मांडली. संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनातील मुद्दे राज्यपालांनी अत्यंत गांभीर्याने ऐकले आणि शासनाकडे स्पष्टीकरण मागवण्याचे आश्वासन दिले. तसेच, काही मुद्द्यांवर लेखी स्पष्टीकरण देण्याची विनंती समितीकडे केली.

या शिष्टमंडळात विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. ॲड. सुभाष लांडे (सीपीआय), आमदार विनोद निकोले (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष), उल्का महाजन (भारत जोडो अभियान), उदय भट (भाकपामाले), ॲड. राजेंद्र कोर्डे (शेतकरी कामगार पक्ष), ब्रायन लोबो आणि अशोक सुर्यवंशी यांचा समावेश होता.

# खंबाळा, राऊत पाड्यातील विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांचा चिखलातून प्रवास

## रस्त्यासाठी ग्रामपंचायतीचे तहसीलदारांना निवेदन

**भिवंडी, दि. २१ : प्रतिनिधी**



भिवंडी तालुक्यातील खंबाळा ग्रामपंचायत हद्दीतील राऊत पाड्यातील ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांचा स्वातंत्र्याच्या ७६ व्या वर्षीच्या उंबरठ्यावरही खडतर प्रवास सुरूच असून ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांना चिखलातून वाढ काढावी लागत आहे. त्यामुळे गावकऱ्यांमधून संबंधित प्रशासनाच्या विरोधात संताप व्यक्त केला जात असून डांबरी किंवा काँक्रिटीकरणाची पायवाट करण्याची मागणी केली जात आहे. त्यानुषंगाने येथील राऊत पाड्यात २०० हून अधिक नागरी वस्ती आहे.दरम्यान सदर पाडा हा ग्रुप ग्रामपंचायत खंबाळा आणि दाभाड या दोन ग्रामपंचायत हद्दीत येत आहे.तर या पाड्यातील नागरिकांना ये जा करण्यासाठी मुख्य रस्ता हा दोन्ही ग्रामपंचायत हद्दीतून जात आहे.परंतु काही शेतकऱ्यांच्या जागा या कच्च्या चिख्खल पायवाट रस्त्यामध्ये येत आहे.त्यामुळे असे शेतकरी रस्ता बांधकामासाठी मज्जाव करीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.विशेष म्हणजे खंबाळा, दाभाड ग्रामपंचायत प्रशासनाने राऊत पाड्यातील रस्ता व्हावा याकरिता यासाठी भिवंडी तहसीलदार कार्यालयात लेखी निवेदनाद्वारे प्रस्ताव सादर केला आहे.दरम्यान ग्रामपंचायतीच्या निवेदनानुसार राऊत पाडा, परशुराम पाड्याकरिता रस्ता पिढी जात वहिवाटीचा असून सदर रस्ता तातडीने तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे.तसेच सदर रस्ता तात्काळ न बनवल्यास राऊत पाड्यातील ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा इशाराही दिला आहे.त्यामुळे येत्या स्वातंत्र्य दिनाच्या ७६ व्या वर्षी तरी राऊत पाड्यातील विद्यार्थी आणि ग्रामस्थांची चिखलातील वाट मोकळी होणार का ? याकडे येथील ग्रामस्थांचे लक्ष लागून राहिले आहे.

# बदलापुरातील कत्तलखान्यांवर नगरपरिषदेची आणि पोलिसांची धडक कारवाई

**बदलापूर, दि. २१ : प्रतिनिधी**



बदलापुरातील गोमांस विक्रीच्या प्रकरणावरून पावसाळी अधिवेशनात संतापाचे वातावरण निर्माण झाले. बदलापूर शहरात अवैध्यरित्या कत्तलखाने सुरू असल्याचे समोर आले होते. त्यावर कारवाई करण्याची मागणी होत होती. अतुल भातखळकर यांनी पावसाळी अधिवेशनात गोमांस विक्री आणि अवैध कत्तलखाने यांवर कारवाई करण्यासाठी मुद्दा उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी कत्तलखान्यांवर तात्काळ कारवाई करण्याचे आश्वासन दिले.त्यावरून काय तासाभरात बदलापूर गावामध्ये कुळगाव बदलापूर नगरपरिषद आणि पोलीसांच्या संयुक्त विद्यमाने धडक कारवाई करण्यात आली. सायंकाळच्या सुमारास बदलापूर गावातील ७ अवैध कत्तलखान्यांवर बुलडोझर चालवून बांधकाम तोडण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनंतर पालिकेने बदलापूर गावातील ५ तर वेशीवरच्या २ कत्तलखान्यांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांनी दिली आहे.

# हाशा हाइट्सवर परिवर्तन पॅनेलचा झेंडा

**वसई, दि. २१ : प्रतिनिधी**

विरार (पूर्व) येथील नारिंगी रेल्वे फाटकजवळील म्रिदा होम्स हाशा हाइट्स गृहनिर्माण सोसायटीच्या व्यवस्थापन समितीच्या सर्वच्या सर्व १५ जागा जिंकून परिवर्तन पॅनेलने निर्विवाद वर्चस्व राखले. परिवर्तन पॅनेलच्या सर्वसाधारण प्रवर्गात (खुला गट) सर्वच्या सर्व १०, महिला गटातील २ तसेच व्हीजे/एनटी/एसबीसी गटातील १ अशा १३ जागा बिनविरोध निवडून आल्या.

एससी/एसटी आणि ओबीसी प्रवर्गातील प्रत्येकी एका जागेसाठी झालेल्या निवडणुकीत अनुक्रमे, बिपीन अशोक मोरे (६९ मते) आणि नितीन सुरेश पंडित (६५ मते) विजयी झाले. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणातर्फे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विकास तानवडे यांनी काम पाहिले.

बिनविरोध निवडून आलेले उमेदवार: सर्वसाधारण (जनरल/खुला गट): संदेश गणेश तांबे, संतोष महादेव जंगम, संदेश जगन्नाथ आंब्रे, नीलेश विजय मोहिते, सुभाष बाबाजी निनावे, महेद्र गंगाराम गोतावडे, राकेश चंद्रकांत गुरव, गणेश भागोजी मुळमुळे, सुनील काशीराम सकपाळ. महिला राखीव: रागिणी बाळकृष्ण जांभळे, सौ. जयश्री संजय शेटे. व्हीजे/एनटी/एसबीसी: प्रशांत युवराज वटकर. एससी/एसटी प्रवर्ग: बिपीन अशोक मोरे (६९ मते). ओबीसी प्रवर्ग: नितीन सुरेश पंडित (६५ मते).

# ठाण्यात पहिली एआय स्मार्ट ॲम्ब्युलन्स

**ठाणे, दि. २१ : प्रतिनिधी**

ठाणे शहर व जिल्ह्यात पहिल्यांदाच एआय आणि 5 जी तंत्रज्ञानाने सुसज्ज स्मार्ट ॲम्ब्युलन्स सुरू होत असून, ही वैद्यकीय क्षेत्रातील एक महत्त्वाची क्रांती ठरणार आहे. मेड्यूलन्स सोबतच्या भागीदारीतून केआयएमएस हॉस्पिटल्सने थेट रुग्ण डेटा ट्रान्सफर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित रुग्ण निरीक्षण अशा सुविधांनी परिपूर्ण एआय 5 जी स्मार्ट ॲम्ब्युलन्स सेवा सुरू केली आहे. ही सेवा पूर्व-रुग्णालयीन काळातही रुग्णाच्या उपचारांची तयारी करून घेण्यास मदत उपयोगी ठरणार आहे.

ठाणे पाटीलपाडा घोडबंदर येथील हिरानंदन इस्टेटमधील केआयएमएस हॉस्पीटल्सकडून ही अद्ययावत रुग्णवाहिका सुरु करण्यात आला आहे. याॲम्ब्युलन्समधून ECG, ऑक्सिजन, बीपी यांसारख्या जीवनावश्यक निदर्शकांची थेट हॉस्पिटलला रिअल-टाईम माहिती पाठवली जाते. रुग्णालयात पोहोचण्याआधीच डॉक्टरांपर्यंत रुग्णाच्या प्रकृतीची सविस्तर माहिती पोहोचवणारे प्रगत तंत्रज्ञान या रुग्णवाहिकेत आहे. सामान्य 5G ॲम्ब्युलन्स आणि केआयएमएसची एआय इंटिग्रेटेड स्मार्ट ॲम्ब्युलन्समुळे वेळेवर उपचार मिळून रुग्ण वाचण्याच्या शक्यता कशा वाढतात.

# प्रेमात अडथळा ठरणाऱ्या पतीची प्रियकराच्या मदतीने निर्घृण हत्या

- **हत्या करुन घरातच सहा फूट खोल खड्ड्यात पुरला मृतदेह**
- **पंधरा दिवसांनी कृत्य उघडकीस, प्रियकरासह पत्नी फरार**

**वसई, दि. २१ : प्रतिनिधी**

प्रेमात अडथळा ठरत असलेल्या पत्नीने प्रियकर आणि त्याच्या साथिदारासह पतीची घरातच हत्या केल्यानंतर त्याचा मृतदेह चक्क घरात सहा फूट खोल खड्ड्यात पुरला. त्यानंतर काही दिवस प्रियकरासोबतच राहत असताना पतीचे कुटुंबिय संशय घेत असल्याचे समजताच प्रियकरासोबत पसार झाली. पतीच्या कुटुंबिये घरी आले असता घरातील जमिनीवर असलेल्या स्टाईल्सबाबत संशय आल्याने त्यांनी खोदकाम केले असता सहा फूट खोल खड्डयात मृतदेह मिळाल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे.

नालासोपारा पूर्वेकडील धानीवबाग परिसरातील साई वेल्फेअर सोसायटीत हाप्रकार घडला आहे. येथील एका चाळीत विजय चौहान (वय ३५ वर्षे) आपली पत्नी चमनदेवी चौहान (वय ३२ वर्षे) हिच्यासोबत रहात होता. चमनदेवीचे वीस वर्षीय मोनू शर्माशी प्रेमसंबंध होते. याची कुणकुण लागल्यावर विजयने तीव्र विरोध करायला सुरुवात केली. त्यातूनच प्रेमप्रकरणात अडथळा ठरत असलेल्या विजयचा काटा काढण्याचा कट चमनदेवी आणि मोनू शर्माने रचला होता. त्याला मोनूचा मित्र सर्वेश गिरीने साथ दिली.

पंधरा दिवसांपूर्वी चमनदेवी, मोनू आणि सर्वेशने हत्येच्या रात्री गुंगीचे औषध पाजून विजयला बेशुध्द केले. त्यानंतर डोक्यावर घाव घालून त्याची हत्या केली. विजयच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी त्यांनी घरातच सहा फूट खोल खड्डा खोदून त्यात मृतदेह पुरुन टाकला. नंतर त्याजागी नव्या स्टाईल्स बसवण्यात आल्या. विजयच्या कुटुंबियांनी काही दिवसांनी विजयबद्दल चमनदेवीकडे चौकशी केली असता तो कामासाठी बाहेर गेल्याचे ती सांगत होती. शेजारीपाजारीदेखिल चौकशी करू लागल्याने त्यांनाही ती खोटी माहिती देऊ लागली. गावगोंगाट होऊन प्रकरण उजेडात येऊन त्रास होईल, याभितीपोटी चमनदेवी, मोनू आणि सर्वेश पळून गेले.

दुसरीकडे, विजय चौहानचा भाऊ अखिलेश चौहान आपल्या कुटुंबियांसह घरी पोचले तेव्हा चमनदेवी गायब झाल्याचे त्याला समजले. कुटुंबियांनी घरात पाहणी केली असता जमिनीवरील स्टाईल्सचा रंग वेगळा असून त्या उंच असल्याचे लक्षात आल्यावर त्यांच्या मनात संशय बळावला. काहीतरी अघटीत घडल्याचा संशय आल्याने त्यांनी शेजाऱ्यांच्या मदतीने त्याठिकाणी खोदकाम केले असता सहा फूट खोल खड्यात कपड्यात गुंडाळलेला विजयचा मृत्यदेह आढळून आला.

याप्रकरणाची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन विजयचा मृतदेह ताब्यात घेऊन पुढील तपासणी सुरु केली आहे. तसेच गुन्हा दाखल करून फरार झालेल्या चमनदेवी, मोनू शर्मा आणि सुर्वेश गिरीचा शोध सुरु केला आहे. या हादरवून टाकणाऱ्या हत्याकांडाने वसईत खळबळ उडाली आहे.

# यंगस्टार ट्रस्टच्या गणित पाठांतर स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**वसई, दि. २१ : प्रतिनिधी**

यंगस्टार ट्रस्टच्या माध्यमातून इयत्ता 4 ते 7 आणि इयत्ता 8 ते 10 च्या विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना देणारी गणित पाठांतर स्पर्धा एक्सपर्ट हायस्कूल, विरार व राजीव गांधी विद्यालय, निळेमोरे नालासोपारा येथे घेण्यात आली होती. या स्पर्धेत उत्कर्ष हायस्कूल, आदर्श हायस्कूल, नॅशनल हायस्कूल आणि पालघर येथील सूर्या हायस्कूलने सहभाग नोंदवला होता. तर निळेमोरे-राजीव गांधी विद्यालयात आयोजित या स्पर्धेत साई छाया, कंचन विद्यालय, क्लोरेजेस हायस्कूल, गुरुकुल हायस्कूल, राजीव गांधी विद्यालय, लिटिल फ्लावर आदी शाळांचा सहभाग होता. या शाळांतील जवळ जवळ 800 विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले होते.

विरार एक्स्पर्ट हायस्कूलमधील गणित पाठांतर स्पर्धेत इ. 4 ते 7 वी या गटात प्रथम क्रमांक ध्रीश कंसारा, द्वितीय वृक्षक भोमटे, तृतीय स्वस्तिक विलकर तर उत्तेजनार्थ क्रमांक वीर शिंदे, विनिता अडकुरकर यांनी पटकावला. इ. 8 ते 10 या गटात प्रथम क्रमांक सार्थक सोनवणे, द्वितीय क्रमांक दिव्या घाडी, तृतीय क्रमांक वेदांत कालसेर यांनी पटकावला. उत्तेजनार्थ पारितोषिक प्रकाश गुप्ता, मृणाली पाटील यांना देण्यात आले.

राजीव गांधी विद्यालय गणित पाठांतर स्पर्धेत इयत्ता 4 ते 7 या गटात प्रथम क्रमांक निर्मयी चौबे, द्वितीय क्रमांक मयुरेश जठार, तृतीय क्रमांक अर्शद शिंदे यांनी पटकावले. तर अनुराग सिंग, वेदांश मिश्रा यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. इ. 8 वी ते 10 वी या गटात प्रथम क्रमांक अनविश सुतार, द्वितीय क्रमांक आदित्य पाटील, तृतीय क्रमांक सर्वेश सरवणकर यांनी पटकावले. तर उत्तेजनार्थ पारितोषिक ऋचा मनवीर, आयुश तिवारी या विद्यार्थ्यांनी यांना देण्यात आले.. याशिवाय; सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

एक्स्पर्ट हायस्कूलच्या सर्वेसर्वा कविता शेट्टी, राजीव गांधी विद्यालयाच्या सीमा पाटील आणि रवी पिल्ले यांनी सर्वतोपरी सहकार्य केले. शाळेचे शिक्षक-कर्मचारी यांनी मेहनत घेतली. बक्षीस समारंभाला माजी नगरसेवक रंजन पाटील, माजी नगरसेविका रिटा सरवैया यांच्यासह शाळा शिक्षक वृंद उपस्थित होता. भूषण चुरी, सुरेखा कुरकुरे, मिलिंद पोंक्षे, मुग्धा लेले, सीमा पाटील यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक स्पर्धा आयोजित होत असतात. याच स्पर्धांचा भाग म्हणून ही अनोखी स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. समन्वयक अजीव पाटील यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा साकारली.

# विक्रमगड तालुक्यात आरोग्य केंद्रांची गरज

**विक्रमगड, दि. २१ : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा सक्षम राहावे व रुग्णांना तत्काळ उपचार मिळावा यासाठी शासनस्तरावर प्राथमिक आरोग्य केंद्र व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र यांची निर्मिती केली आहे.

लोकसंख्येच्या इष्टांक लक्षात घेऊन आता असलेली उपकेंद्र कमी पडत असून ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी विक्रमगड तालुक्यातील चाबके तलावली, म्हसरोली, केव ,खुडेद, सारशी, करसुड, उपराळे, देहजे, सातकोर, वसुरी, ईदगाव, केगवा, वेहेलपाडा, जवळजवळ विक्रमगड तालुक्यातील वीस नविन उपकेंद्र मंजूर करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर पाठवण्यात आला आहे. उपराळे आलोंडा या ठिकाणी नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राची मागणी अनेक दिवसांपासून करण्यात येत असून या विभागातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांना तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे.

# प्रतिबंधित गुटख्याची विक्री करणाऱ्या एका तरुणास कोनगाव पोलिसांनी घेतले ताब्यात

**भिवंडी, दि. २१ : प्रतिनिधी**

भिवंडीतील कोनगाव परिसरात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या पान टपरीवर प्रतिबंधित गुटख्याची विक्री करणाऱ्या एका तरुणास कोनगाव पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे.सानेबुल हमेदुल शेख (२० रा. भिवंडी, मूळ विहारचा रहिवासी) असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोनगाव येथील ड्रीम कॉम्प्लेक्स कंपाऊंड मधील ताहीर पान शॉप नावाने सुरू असलेल्या पान टपरीवर बेकायदेशीर रित्या प्रतिबंधित सुगंधित गुटख्याची विक्री होत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने सदर ठिकाणी १८ जुलै रोजी छापा टाकला असता प्रतिबंधित गुटख्याची बेकायदेशीरपणे विक्री होत असल्याचे तपासात उघड झाले आहे.याप्रकरणी टपरी चालक सानेबुल शेख याच्या विरोधात अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकारी स्मिता विश्वनाथ हिरेमठ यांच्या फिर्यादीवरून कोनगाव पोलिस ठाण्यात अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून त्यास अटक केली आहे. त्याच्याकडून ४ हजार २०६ रुपये किमतीचा प्रतिबंधित पान मसाला व सुगंधित तंबाखू जप्त करण्यात आला आहे.विशेष म्हणजे ही पानं टपरी ड्रीम कॉम्प्लेक्स कंपाउंड मध्ये बेकायदेशीर रित्या टाटा विद्युत वाहिनीच्या खाली उभारली असून ड्रीम कॉम्प्लेक्स फेडरेशनच्या वतीने ही बेकायदेशीर टपरी हटावी म्हणून स्थानिक ग्रामपंचायत, कोनगाव पोलीस स्टेशन, आणि एम एम आर डी अधिकाऱ्यांना गेल्या तीन वर्षापासून लेखी पत्र व्यवहार करून ही टपरी हटवण्याची मागणी करीत असल्याची माहिती फेडरेशनचे चेअरमन मलिक हुसेन यांनी दिली आहे. त्यामुळे आता तरी बेकायदेशीर टपरीवर कारवाई करत सदर टपरी संबंधित प्रशासन हटवणार का ? असा सवालही रहिवाशांनी उपस्थित केला आहे.

# गटारीच्या ओल्या पार्ट्यांसाठी फॉर्म 'हाऊसेस' फुल्ल

## मद्य विक्रेत्यांसह मांस, मच्छी फार्म हाऊस मालकांना अच्छे दिन



**भिवंडी, दि. २१ : प्रतिनिधी**

> ऐरवीप्रमाणेच गटारीसाठीही दर एकसारखेच घेत असून एका दिवसासाठी भाव वाढवून घेत नाही.परंतु काही ठिकाणी गटारीच्या पार्श्वभूमीवर फार्म हाऊसेसचे दर अव्वाच्या सव्वा आकारले जात आहेत.
>
> **- रंजित पाटील फार्म हाऊस मालक**

दर्श अमावस्या अर्थातच खवय्यांची 'गटारी' ची धूम सर्वत्रच पाहायला मिळत आहे.विशेष म्हणजे अनेकांनी रविवार पासूनच गटारी साजरी करण्यास सुरुवात केली आहे.परंतु दर्श अमावस्या २३ जुलै रोजी असून २४ तारखेपासून श्रावणमास सुरू होत आहे.त्यामुळे बुधवारच्या गटारीची जोरदार तयारी करण्यास नागरिकांनी सुरुवात केली आहे.त्यातच मच्छीचे भाव दुपटीने वधारले असून मद्याचे दरही काही प्रमाणात वाढले आहेत.यामुळे दरवर्षी पेक्षा यावर्षी गटारी सर्वांसाठीच महागणार आहे.परंतु या सर्वांपेक्षा विशेष म्हणजे सद्यस्थितीत ओल्या पार्ट्यांसाठी ट्रेंड्स ठरत असलेल्या फार्म हाऊसची क्रेझ ठाणे जिल्ह्यात पाहायला मिळत आहे.स्विमिंग पूल, तरुणाईसह ज्येष्ठांमध्ये इन्स्टावर रिल्स बनवण्याची उत्सुकता,डिझेवर नाच गाणी या व अशा विविध कारणांमुळे फार्म हाऊसचा वाढता प्रभाव प्रामुख्याने दिसून येत आहे. तर गटारीच्या या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील अनेक फॉर्म हाऊसेस फुल्ल झाल्याचे पहायला मिळत असून फॉर्म हाउस बुकिंगचे दर दुपटीने वाढल्याचे समजते.त्यामुळे फार्म हाऊस मालकांना अच्छे दिन आल्याचे बोलले जात आहे.कारण ऐरवी बुकिंगसाठी ७ ते ८ हजार रुपये दर असणारे फार्म हाऊसेसचे दर गटारी निमित्त १२ ते १५ हजार रुपयांवर पोहचले आहेत.परंतु असे असतानाही तळीरामांसह तरुणाई व ज्येष्ठांचीही पसंती या फार्म हाऊसेसला मिळत असल्याचे ठाणे जिल्ह्यासह भिवंडीतून उघड होत आहे.एकीकडे गटारीच्या तोंडावर बाजारात मांस,मच्छीचे भाव कडाडले असतानाच दुसरीकडे फार्म हाऊस मालकांनी खाल्लेला भाव यामुळे नागरिकांच्या खिशाला चांगलीच कात्री लागणार आहे. मात्र असे असतानाही खवय्यांमध्ये गटारीची क्रेझ शिगेला पोहचली असून गटारी साजरी करण्यासाठी खवय्यांनी नक्कीच कंबर कसली आहे.

# मोबदल्यासाठी शेतकऱ्यांना कोर्टात जाण्याचा सल्ला

**मुरबाड, दि. २१ : प्रतिनिधी**

कल्याण-मुरबाड-टोकावडे-माळशेज घाट रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे. दोन्ही बाजूच्या रस्त्यात शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत. शेतकऱ्यांना मोबदला मिळाला नाही. शेतकऱ्यांनी याबाबत उपोषणही केले. तरी त्यांचे कोणी ऐकून घेत नाही.त्यामुळे शेतकऱ्यांनी कोर्टात जावे, असा सल्ला माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी मुरबाड येथे शेतकऱ्यांना दिला.

कपिल पाटील फाउंडेशनतर्फे मुरबाड येथे शुक्रवारी कार्यकर्त्यांचा स्नेहमेळावा झाला. त्यापूर्वी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत विविध विषयांवर चर्चा केली. त्यावेळी ते बोलत होते. मुरबाड-कल्याण रस्त्यावर पाचवा मैल ते मुरबाड आणि माळशेज घाट रस्त्यावर कदम पाडा ते सावर्णे यादरम्यान रस्ता रुंदीकरणाचे काम जोरात सुरू आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या खासगी जमिनी रस्त्याच्या कामासाठी गेल्या. परंतु त्यांना मोबदला मिळालेला नाही. हे बरोबर नाही. असे मत त्यांनी व्यक्त केले. नवीन खासदारांची निवड होऊन एक वर्ष पूर्ण झाले. या वर्षभरात नवीन खासदारांनी एकही काम केले नाही. आतापर्यंत जी कामे चालली आहेत, ती माझ्या कारकिर्दीत मंजूर झालेली आहेत, अशी टीका पाटील यांनी केली. शहापूर-मुरबाड-कर्जत रस्त्याचे काम अपूर्ण असून निकृष्ट दर्जाचे झाले आहे. त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाने पाठपुरावा करून रस्त्याचे काम पूर्ण केले पाहिजे, असे यावेळी पाटील म्हणाले.

# कॉर्न आलू मसाला चाट

झटपट रेसिपी

**ए**खाद्या निवांत संध्याकाळी मित्रमंडळींसोबत गप्पांचा फड जमवताना काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. एखाद्या चाट पदार्थामुळे तोंडाला छान चव येते. अशावेळी झटपट तयार होणारी कॉर्न आलू मसाला चाट ही रेसिपी तुम्ही ट्राय करू शकता.

**सामग्री :** एक कप उकडलेले स्वीट कॉर्न, उकडलेल्या बटाट्याचे काप एक कप, दोन टोमॅटो, एक टेबलस्पून आल्याची पेस्ट, अर्धा टेबलस्पून हळद, प्रत्येकी एक टेबलस्पून जिरेपूड, धनेपूड आणि लाल तिखट, मॅगी मसाल्याचं एक पाकीट, चिमटूभर हिंग, दोन हिरव्या मिरच्या, अर्ध लिंबू, चिरलेली कोथिंबिर, तीन चमचे तेल, चवीनुसार मीठ



**कृती :** टोमॅटो आणि हिरवी मिरची बारीक चिरून घ्या. एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर त्यात जिरेपूड घालून मंद आचेवर परतून घ्या. आता त्यात हिंग, आल्याची पेस्ट, हिरवी मिरची घालून परता. यानंतर टोमॅटो, हळद, धनेपूड, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घाला. टोमॅटो नीट शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजल्यावर त्यात स्वीट कॉर्न आणि बटाटे घालून हलवून घ्या. कढई झाकून ठेवा. पाच मिनिटांनंतर मध्यम आचेवर कॉर्न-बटाट्याचं मिश्रण परतून घ्या. मग त्यात मॅगी मसाला घालून हलवून घ्या. गॅस बंद करून लिंबाचा रस आणि कोथिंबिर घाला. कॉर्न आलू चाट तयार आहे. त्यावर शेव आणि कांदा घालून खाता येईल.




## शेर की जुबानी

इन अजनबी सी राहों में,
जो तू मेरा हमसफर हो जाए,
बित जाए पल भर में ये वक्त,
और हसीन सफर हो जाए।

मैं चुप कराता हूं, हर
शब उमडती बारिश को,
मगर ये रोज, गई बात
छेड देती है।

राज खोल देते हैं नाजुक
से इशारे अक्सर, कितनी
खामोश मोहब्बत की
जुबान होती है।

# संन्यास सोडून उभारला उद्योग

अचिव्हर

**शो**भित कुमार सिंह यांची कहाणी फारच प्रेरणादायक आहे. त्यांनी आयुष्यात अनेक चढ-उतारांचा सामना केला. एकेकाळी संन्यास घेण्यासाठी निघालेले शोभित आज एक यशस्वी उद्योजक आहेत. कानपूरचे रहिवासी असलेले शोभित जवळपास दीड वर्ष आश्रमात सन्यांसी म्हणून राहत होते. मात्र आई-वडिलांच्या दबावामुळे त्यांना पुन्हा घरी यावे लागले. त्यानंतर शोभित यांनी लग्न केले. आज शोभित १२० कोटी रुपयांचा टर्नओव्हर असलेल्या खेळणी आणि स्टेशनरी ब्रँडचे मालक आहेत.

शोभित कुमार सिंह उत्तर प्रदेशातील कानपूर येथील रहिवासी आहेत. त्यांचा जन्म एका धार्मिक कुटुंबात झाला असून त्यांनी १९९७ मध्ये अलीगढ मुस्लिम युनिव्हर्सिटीमधून इकॉनॉमिक्समध्ये बीए ऑनर्स केले होते. १९९९ मध्ये त्यांनी फायनान्समध्ये एमबीए केले. त्यांनी दिल्लीत एका जर्मन सॉफ्टवेअर कंपनीत पहिली नोकरी केली. तिथे त्यांनी असिस्टंट मॅनेजर म्हणून काम केले. सुरुवातीपासूनच त्यांचे मन अध्यात्माकडे झुकलेले होते. त्यांनी विविध धर्मांचा अभ्यास केला. त्यात वैदिक व्यवस्थापन कार्यक्रम, इस्लामिक शिकवणी आणि ख्रिश्चन धर्मशास्त्र यांचा समावेश आहे.

एमबीए आणि नंतर जर्मन सॉफ्टवेअर फर्ममध्ये करिअर सुरू केल्यानंतर वयाच्या २६ व्या वर्षी शोभित यांनी भौतिक सुखाचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. ते ऋषिकेश येथे महर्षी महेश योगी यांच्या आश्रमात सन्यासी म्हणून राहू लागले. तिथे त्यांनी जवळपास १८ महिने वास्तव्य केले. साधारण दीड वर्षांनंतर आई-वडिलांच्या दबावानंतर त्यांनी सन्यांसी आयुष्य सोडून लग्न केले. त्यांची पत्नी बडोद्यातील एका व्यावसायिक कुटुंबातील होती. त्यामुळेच त्यांनी व्यवसायात पाऊल ठेवले.



शोभित कुमार सिंह यांनी २०१६ मध्ये 'स्टोन सफायर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' ही कंपनी सुरू केली. कंपनीने त्यांच्या ब्रँडअंतर्गत लहान मुलांची खेळणी आणि स्टेशनरीचे मार्केटिंग सुरू केले. त्यांनी 'स्टोन सफायर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'ला एक अग्रगण्य मेक इन इंडिया स्टेशनरी आणि खेळण्यांचा ब्रँड बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. त्यांच्या कंपनीचा टर्नओव्हर १२० कोटींचा आहे. त्यांनी मुलांसाठी 'आर्ट अँड कल्चर किट'ची देखील सुरुवात केली होती. त्यानंतर स्टेशनरी, खेळणी, गेम्स आणि होम प्रॉडक्ट्सच्या उत्पादनाला सुरुवात केली. शोभित यांच्याकडे ५००हून अधिक एसकेयू (स्टॉक-कीपिंग यूनिट्स) आहेत. त्यांनी प्ले-डॉ, माय लिटिल पोनी, प्लेस्कूल, बार्बी, हॉट व्हिल्स, मार्व्हल, फ्रिशर-प्राइस, डिज्नी सारख्या प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय ब्रँडसाठी खेळण्यांच्या उत्पादनाचे लायसन्स मिळवले आहे. कंपनीकडे संपूर्ण भारतात वितरण नेटवर्क आहे. तीस हजारांहून अधिक दुकानात त्यांचा माल जातो.

# लग्न ठरत नाही...



मॅच मेकिंग

**मी** २९ वर्षांचा तरुण असून बँकेत चांगल्या पदावर नोकरी करतो. मी दिसायला चारचौघांसारखाच आहे. गेल्या वर्षभरापासून माझ्यासाठी वधूसंशोधन सुरू आहे. पालकांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. सर्वतोपरी प्रयत्न करूनही माझं लग्न ठरत नाही. आम्ही वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती दिल्या आहेत. विविध मॅट्रिमोनिअल साईट्सवरही नाव नोंदवलं आहे. कधी पत्रिका जुळत नाहीत तर कधी स्वभाव न जुळल्यामुळे बोलणी फिस्कटतात. मी एका सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबातला मुलगा आहे. आर्थिकदृष्ट्याही स्थिरस्थावर आहे. त्यामुळे आता लग्न करायचं आहे. पण लग्न ठरण्यात येणाऱ्या अडचणींमुळे मी खूप अस्वस्थ आहे. अनेकदा मला खूप निराश वाटतं आणि मी नियतीला दोष देत बसतो. माझ्यावर मनापासून प्रेम करणारी मुलगी कधीच मिळणार नाही, असं आता वाटू लागलं आहे. मी काय करू?

**उत्तर** : सुयोग्य जोडीदार कधी मिळेल, हे कोणीच ठामपणे सांगू शकणार नाही. सद्यपरिस्थितीत तू स्वत:ला वेळ दे. स्वविकास करण्याचा प्रयत्न कर. व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी असणं आणि सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबाचा भाग असणं या तुझ्या जमेच्या बाजू आहेत. सततच्या अपयशामुळे खचणं, नैराश्य येणं स्वाभाविक आहे. यातून बाहेर पडण्यासाठी समुपदेशकांची मदत घेता येईल. सोशल मीडियाच्या माध्यमातून तू समविचारी लोकांशी संवाद साध. नव्या लोकांना भेटण्यासाठी काही ग्रुप्समध्ये सहभागी हो. लग्न ही जन्मभराची कमिटमेंट आहे. गोष्टी जुळून यायला वेळ लागतो. तू धीर सोडू नकोस. मुख्य म्हणजे उतावळेपणाने कोणताही निर्णय घेऊ नकोस. तुला मनासारखा जोडीदार नक्कीच मिळेल.

# जगातील दुसऱ्या क्रमांकाची भिंत

भटकंती

**ज**गातील सर्वात लांब भिंत म्हटले, की चीनमधील 'द ग्रेट वॉल' आठवते, परंतु जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात लांब भिंत आपल्या भारतातच आहे हे अनेकांना आजवर ठाऊक नाही. ही भिंत शतकानुशतके शत्रूंपासून संपूर्ण राज्याचे रक्षण करते आहे.

राजस्थानमधील कुंभलगड किल्ल्यात जगातील दुसरी सर्वात लांब भिंत आहे. हा फक्त एक किल्ला नाही, तर शौर्य, कला आणि इतिहासाचा जिवंत पुरावा आहे. तो अजूनही अरवली टेकड्यांमध्ये अभिमानाने उभा आहे.


**भारताची 'ग्रेट वॉल'**

उदयपूरपासून सुमारे ८४ किलोमीटर अंतरावर असलेल्या अरवलीच्या टेकड्यांमध्ये असलेला हा किल्ला घनदाट जंगलांनी वेढलेला आहे. १५ व्या शतकात महाराणा कुंभ यांनी हा किल्ला बांधला होता. त्यांनी कोणताही बाह्य आक्रमणकर्ता सहज प्रवेश करू शकणार नाही, अशा प्रकारे हा किल्ला बांधला होता. यामुळेच कुंभलगडच्या सुरक्षा भिंती इतक्या मजबूत आणि रुंद बनवल्या गेल्या, की त्याला 'भारताची ग्रेट वॉल' म्हणून ओळखले जाऊ लागले.

**३६ किलोमीटर लांबीची भिंत**

या किल्ल्याची भिंत सुमारे ३६ किलोमीटर लांबीची आहे. ती चीनच्या 'ग्रेट वॉल' नंतर जगातील दुसरी सर्वात लांब भिंत आहे. ती इतकी रुंद आहे, की आठ घोडे एकत्र धावू शकतात. या किल्ल्याची मजबूती आणि रचना पाहता कोणत्याही शत्रूला तो जिंकणे सोपे नव्हते, याचा अंदाज लावता येतो.

कुंभलगड येथे शूर योद्धा, महाराणा प्रताप यांचा जन्म झाला. त्यांनी कधीही मुगलांकडून पराभव स्वीकारला नाही. म्हणूनच हा किल्ला केवळ एक वास्तुशिल्पाचा चमत्कार नाही, तर राजस्थानची ओळख आणि धैर्याचे प्रतीकदेखील आहे.



**कला आणि श्रद्धेचा संगम**

कुंभलगड हा केवळ एक लष्करी किल्ला नव्हता. येथे ६० हून अधिक हिंदू आणि जैन मंदिरेदेखील बांधली गेली आहेत. त्यामुळे हे ठिकाण राजकीय आणि लष्करी कारवायांचे केंद्र तर होतेच, पण धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक समृद्धीचेही केंद्र आहे. किल्ल्याच्या आत बांधलेल्या मंदिरांचे कोरीव काम आणि स्थापत्य आजही धर्म, कला आणि शक्ती एकमेकांना कसे पूरक होते, हे दाखवते. विशेष म्हणजे प्रत्येक मंदिर एका विशिष्ट उद्देशाने बांधले गेले होते. काही ध्यानांसाठी, तर काही शौर्याच्या पूजेसाठी. किल्ल्याच्या वेगवेगळ्या भागांना वेगवेगळी नावे आहेत. 'दानीवा' भाग किल्ल्याच्या पूर्वेकडील बाजूस आहे, तर 'हिराबारी' ही पश्चिमेकडे जाणारी दुसरी वाट आहे. कुंभलगड किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी सात दरवाजे तयार केलेले आहेत. प्रत्येक दगड, प्रत्येक भिंत आणि प्रत्येक दरवाजा इतिहासात दडलेले काहीतरी सांगत असतो. या किल्ल्याच्या चारही बाजूंनी रात्री मशाली पेटवल्या जातात. त्यामुळे तो रात्री उजळून निघतो. हा किल्ला आणि भिंत पाहण्यासाठी अनेक पर्यटक येथे येत असतात. म्हणूनच 'युनेस्को'च्या जागतिक वारसा यादीत याचा समावेश करण्यात आला आहे.

## टेक टॉक

### इंजिन गरम होतेय?



ट्रॅफिकमध्ये थांबल्यामुळे किंवा सतत रायडिंग केल्यामुळे बाईकचे इंजिन ओव्हरहीट होऊ लागले तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. कारण बाइकचे इंजिन खराब होऊ शकते किंवा मायलेज कमी होऊ शकते. अतिवेगाने वाहन चालवणे टाळले पाहिजे. अतिवेगाने वाहन चालवल्यावर बाइकच्या इंजिनचे नुकसान होते. इतकेच नाही तर बाईकचे इंजिन वेगाने गरम होते आणि मायलेज झपाट्याने कमी होते. बाइकमध्ये कधीही ट्रिपलिंग करू नका कारण असे केल्याने बाइकच्या इंजिनवर प्रचंड ताण येतो आणि मग बाईकचे इंजिन ओव्हरहीट होऊ लागते. इंजिन जास्त गरम झाल्याने आग लागू शकते. अशावेळी इंजिन ऑईल आणि कूलंट लेव्हलची काळजी घेणे गरजेचे आहे. कमी कूलंटमुळे इंजिन जास्त गरम होऊ शकते. जास्त उष्णतेमुळे जवळच्या इंधन किंवा तेलाच्या पाईपमध्ये आग लागू शकते. कूलंटमुळे इंजिन थंड राहते. इंजिन ऑईलची पातळीही योग्य असावी. इंजिन ऑईल किंवा ट्रान्समिशन फ्लुइडची गळती तपासा. उन्हाळ्यात नेहमी बाईक सावलीत पार्क करण्याचा प्रयत्न करा.


## जाणून घ्या




### इंटरनेटशिवाय पैसे कसे पाठवाल?

इंटरनेट नसताना पैसे पाठवायचे असतील तर सर्वप्रथम *९९ टाइप करा आणि कॉल करा. यानंतर तुम्हाला भाषा निवडण्याचा पर्याय मिळेल. भाषा निवडल्यानंतर १ डायल करा. यानंतर ज्या यूपीआय आयडीवर तुम्हाला पैसे पाठवायचे आहेत ती माहिती भरा. यानंतर 'यूपीआय' पिन टाकण्यास सांगितले जाईल. पिन व्हेरीफाय झाल्यानंतर तुम्ही समोरच्या व्यक्तीला पैसे पाठवू शकाल. या सेवेद्वारे तुम्ही फक्त ५००० रुपयांपर्यंत ट्रान्सफर करू शकता. *९९ ला कॉल करुन तुम्ही तुमचा 'यूपीआय' पिन बदलू शकता. मोबाईलच्या डायलरमध्ये *९९ कोड टाका आणि कॉल करा. यानंतर भाषा निवडा. यानंतर सेट यूपीआय पीनचा पर्याय निवडा. हा पर्याय ५ व्या क्रमांकावर मिळू शकेल. यानंतर अकाउंट नंबरचे शेवटचे ६ अंक आणि डेबिट कार्डची एक्सपायरी डेट टाका. यानंतर मोबाइल नंबरवर एक ओटीपी पाठवला जाईल. तो ओटीपी टाका. यानंतर तुम्हाला यूपीआय पिन सेट करण्यास सांगितले जाईल.

## ॲप वर्ल्ड




### वायफाय ट्रॅकिंग धोकादायक?

'ॲपल'च्या मते 'वायफाय ट्रॅकिंग' हे फीचर चांगली नेटवर्क कनेक्टिव्हिटी आणि लोकेशन-आधारित सेवा देते. परंतु याचा तुमच्या गोपनीयतेवर आणि फोन बॅटरीवर वाईट परिणाम होतो. वायफाय ट्रॅकिंगमुळे लोकेशन लीक होण्याचा धोका वाढतो. तुमचा डेटा तुमच्या संमतीशिवाय शेअर केला जाऊ शकतो. बॅटरी जलद संपते. कारण फोन सतत नेटवर्क स्कॅन करतो. काही 'थर्ड पार्टी ॲप्स' या डेटाचा गैरवापर करू शकतात. ट्रॅकिंगमुळे तुमचा फोन सायबर हल्ल्याला बळी पडू शकतो. वायफाय ट्रॅकिंग बंद करणे खूप सोपे आहे. त्यासाठी फक्त पुढील काही गोष्टी कराव्या लागतात. १. आयफोनच्या सेटिंग्जमध्ये जा २. खाली स्क्रोल करा आणि गोपनीयता आणि सुरक्षावर टॅप करा ३. नंतर लोकेशन सर्व्हिसेस पर्यायावर जा ४. तळाशी सिस्टम सर्व्हिसेस निवडा. येथे तुम्हाला नेटवर्किंग आणि वायरलेसचा पर्याय दिसेल ६. त्यावर क्लिक करा आणि टॉगल करा. कृपया हे लक्षात ठेवा ही सेटिंग बंद केल्याने तुमचा आयफोन वायफायशी कनेक्ट होण्यापासून थांबणार नाही. फरक एवढाच असेल, की आता तुमचे लोकेशन वायफाय नेटवर्कद्वारे ट्रॅक केले जाणार नाही.

# करा परदेशात एलएलबी

उच्च शिक्षण



**मी**खर्चात परदेशातून कायद्याचे शिक्षण घेण्याची इच्छा आहे का? मग ही अत्यंत चांगली संधी आहे. अनेक देशांमध्ये कायद्याचे शिक्षण अत्यंत स्वस्त दरात दिले जाते. स्वस्त असण्यासोबतच या पदवीला जगभर मान्यतादेखील असते. त्यामुळे ही पदवी घेऊन जगभरात कुठेही वकिलीचा व्यवसाय सुरू करू शकता. जर्मनी, फ्रान्स, स्पेन आणि पोर्तुगाल हे युरोपीयन देश एलएलबीसाठी कमी ट्युशन फी आणि स्वस्त राहणीमानासाठी प्रसिद्ध आहेत. या देशांमधील सरकारी विद्यापीठांमध्ये मोफत शिक्षण दिले जाते. ज्या ठिकाणी ट्युशन फी घेतली जाते. तीदेखील अत्यंत कमी असते. त्यामुळे परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी हे देश उत्तम पर्याय ठरु शकतात.

भारतमध्येही कायद्याचं शिक्षण स्वस्तात मिळते. विशेषतः लहान शहरांतील खासगी महाविद्यालयांमधील एलएलबीची फी दहा हजारांपासून ते दीड लाखांपर्यंत असते. बांग्लादेश हा भारताचा शेजारी देश असून इथे एलएलबीसाठी वार्षिक ट्यूशन फी ३० हजारांपासून सुरू होते. याच देशातील काही ठिकाणी एक लाखांपर्यंत फी घेतली जाते. इथली भाषा, राहणीमान आणि संस्कृती भारतासारखीच असल्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांसाठी इथे शिक्षण घेणे सोपे ठरते. नेपाळमध्येही एलएलबीसाठी ४० हजारांपासून ते एक लाख २० हजारांपर्यंत फी आहे. दोन्ही देश भारताचे शेजारी देश आहेत. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांसाठी अधिक अनुकूल मानले जातात.

रशिया आणि तुर्कस्तानमध्येही एलएलबी शिक्षण कमी खर्चात करता येऊ शकते. मात्र या देशांमध्ये राहण्याचा किंवा इतर खर्च जीवनावश्यक खर्च जास्त आहेत. त्यामुळे इतर दोन देशांच्या तुलनेत रशिया आणि तुर्कस्तानमध्ये शिक्षणाचा खर्च थोडा जास्त असू शकतो.

# विमानात कोणते कपडे घालाल ?

फॅशन पॅशन

**आ**पण नेहमीच फॅशनच्या किंवा आरामाच्या नावाखाली शॉर्ट्स् किंवा क्रॉप कपडे घालून बाहेर पडतो. मुली क्रॉप टॉप आणि शॉर्ट्स् घालून बाहेर पडतात आणि मुलेही शॉर्ट्स् किंवा कॅप्रीज घालून बाहेर पडतात; पण लांबच्या प्रवासात याच गोष्टी त्रासदायक ठरतात. कारण ३८ हजार फूट उंचीवर उडणाऱ्या विमानात एसी एक मिनिटही थांबू शकत नाही. अशा परिस्थितीत, एकतर व्यक्तीकडे स्वतःचे ब्लँकेट किंवा शाल असावी किंवा थंडीपासून संरक्षण करू शकतील असे कपडे असावेत. छोट्या कपड्यांमुळे प्रवासभर कुडकुडत राहावे लागू शकते.

**फ्लिप फ्लॉप्स**

फ्लिप फ्लॉप फुटवेअर आरामदायी असले, तरी अशा चपलांचा इमर्जन्सी गेटकडे जाण्यासाठी अजिबात उपयोग नाही. त्यामुळे धावताना पडू शकता आणि दिसायलादेखील अशा चपला विमानतळावर अजिबात चांगल्या दिसत नाहीत.

**पॉलिस्टर आणि सिंथेटिक कपडे**

असे कपडे कितीही चमकदार आणि ब्रँडेड दिसत असले, तरी त्यांचे कापड अजिबात योग्य नसते. फ्लाइटमध्ये एसीच्या तापमानात चढ-उतार होतो. त्यामुळे मध्येच एसी काम करत नसेल तर अशा कपड्यांमध्ये अस्वस्थ वाटू शकते. विमानाला टेकऑफ करण्यासाठी थोडा वेळ लागतो. अशा परिस्थितीत उकाड्यात बसू शकत नाही. म्हणून ब्रिदेबल म्हणजेच सुती कपडे घालणे चांगले ठरते.



आगीपासून कोणीही वाचू शकत नाही. विमान प्रवासात घट्ट कपडे घालण्याचा प्रयत्न करू नका. कारण कधी कुठेही आगीसारखी परिस्थिती उद्भवली तर सिंथेटिक कापड लवकर आग पकडतात आणि त्यात लवकर अडकू शकता. असे होऊ नये असे वाटत असेल तर असे कापड घाला, जे तुमचे आगीपासून संरक्षण करू शकतील.

**स्ट्रेचेबल किंवा ॲडजस्टेबल कपडे**

विमानात प्रवास करताना, असे कपडे घालावेत जे स्ट्रेचेबल आणि ॲडजस्टेबल असतील. कारण विमान टेकऑफ करते, तेव्हा अनेकांना पोट फुगणे, डोके जड होणे किंवा उलट्या झाल्यासारखे वाटणे या समस्या जाणवू शकतात. त्यामुळेच तुम्ही हवे तसे ॲडजस्ट करता येतील किंवा सैल असतील असे कपडे घालणे चांगले ठरते. गरज पडल्यास ते काढता येतील.

# अर्ज तरी करा

**स**ध्या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढतो आहे. त्यामुळे सातत्याने नव्या संधी, नव्या नोकऱ्या निर्माण होत आहेत. मात्र विद्यार्थी अशा नोकऱ्यांसाठी तयार नसतात. आपल्याकडे पुरेशी कौशल्यं नाहीत असं त्यांना वाटतं. या कारणामुळे ते अर्जही करत नाहीत. मात्र एखाद्या नोकरीसाठी शैक्षणिकदृष्ट्या पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांनीही अर्ज करायला हवेत.



वेगळ्या वाटा


सध्या कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या पदांची निर्मिती होते आहे. आधी अशी पदं अस्तित्त्वात नव्हती. बदलतं तंत्रज्ञान, सोशल मीडियाचा वाढता वापर यामुळे सगळं गणित बदलून गेलं आहे. त्यातच कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही देतात. त्यामुळे घाबरून जायचं काहीच कारण नाही. सध्याच्या काळात अनेक नव्या संधी उपलब्ध होत आहेत. आपण प्रत्येक क्षेत्रातले तज्ज्ञ असू शकत नाही. मात्र प्रशिक्षण घेतल्यानंतर आपण कौशल्यं विकसित करू शकतो. त्यामुळे अशा संधी साधायला काहीच हरकत नाही. किमान अर्ज तर नक्कीच करायलाच हवा. नोकरीच्या बाजारपेठेवर नजर टाकली तर ८४ टक्के कंपन्या नव्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतात. त्यामुळे आपल्याकडे कौशल्यं नसतील तरी ती आत्मसात करता येतात. जवळपास ४२ टक्के अर्जदारांकडे नोकरीशी संबंधित कौशल्यं नसतात असं एक अहवाल सांगतो. त्यामुळे तरुणांनी नोकरीसाठी अर्ज करून किमान मुलाखत द्यावी असं तज्ज्ञ सांगतात.

# टाळा या चुका

फिटनेस फंडा

**'वॉ**र्म अप' आणि 'कूल डाउन' ही व्यायामाची महत्त्वाची अंग आहेत. वॉर्म अपमुळे शरीर व्यायामासाठी सज्ज होतं. यामुळे दुखापती टाळता येतात. कूल डाउनमुळे हृदयाचे ठोके आणि श्वास पूर्वपदावर यायला मदत होते. पण अनेक जण फक्त मुख्य व्यायामावर भर देतात. वॉर्म अप आणि कूल डाउन किती महत्त्वाचं आहे हे अनेकांच्या गावीही नसतं. आपल्या काही चुकांमुळे व्यायामाचे सगळे लाभ मिळत नाहीत. व्यायामादरम्यान होणाऱ्या काही चुकांविषयी...


* धावपळीच्या दिनक्रमात वॉर्म अप टाळलं जातं. मात्र वॉर्म अपमुळे हृदयगती वाढते. स्नायूंना ऑक्सिजनयुक्त रक्ताचा पुरवठा होतो. शरीराचं तापमान वाढतं. वॉर्म अपमुळे शरीर व्यायामासाठी सज्ज होतं.
* काही जण झटपट वॉर्म अप उरकतात. दोन मिनिटं वॉर्म अप केलं की झालं, असं काहींना वाटतं. ही खूप मोठी चूक आहे. व्यायाम करण्याआधी ५ ते १० मिनिटं वॉर्म अप करावं.
* प्रत्येक व्यायामप्रकाराआधी वेगळं वॉर्म अप करावं लागतं. मात्र आपण एकाच पद्धतीने वॉर्म अप करत रहातो. यामुळे व्यायामाचं तंत्र बिघडतं.
* व्यायामानंतर कूल डाउन केलं नाही तर स्नायूंना त्रास होऊ शकतो. कूल डाउननंतर व्यायामामुळे झालेली शरीराची झीज भरून निघते.
* व्यायामानंतर शरीर ताणायला हवं. व्यायामादरम्यान स्नायूंमध्ये लॅक्टिक ॲसिड साचतं. यामुळे स्नायूंमध्ये वेदना जाणवतात. शरीर ताणल्यामुळे हा त्रास कमी होऊ शकतो. अर्थात स्ट्रेचिंगचं हे सत्र वेदनादायी नसावं. स्ट्रेचिंगमुळे त्रास होत असेल तर तज्ज्ञांची मदत घ्यावी.



* वॉर्म अपची सुरुवात धीम्या गतीने करावी. हे व्यायाम सौम्य असावेत. व्यायामाची गती हळूहळू वाढवायला हवी. अचानक तीव्र व्यायाम केला तर स्नायूंवर ताण येऊन टिश्यू फाटू शकतात.
* व्यायाम अचानक थांबवू नये. वॉर्म अपप्रमाणे कूल डाउनही धीम्या गतीने करावं. तुम्ही धावण्याचा व्यायाम करत असाल तर कूल डाउनसाठी आधी जॉगिंग करावं. मग ब्रिस्क वॉकिंगकडे वळावं आणि शेवटी हळू चालावं आणि थांबावं.

# सेंसेक्समध्ये 443 अंकांची वाढ

## गुंतवणूकदारांना 2 लाख कोटींचा फायदा



**मुंबई, दि. २१ प्रतिनिधी**

शेअर बाजार सोमवारच्या सत्रात वाढीसह बंद झाला. दोन्ही बेंचमार्क निर्देशांक सेंसेक्स आणि निफ्टी ५० हिरव्या चिन्हावर बंद झाले.

सोमवारी सेंसेक्सने ८१,९१८ च्या स्तरावर सुरूवात केली आणि दिवसाअखेर ०.५४ टक्क्यांच्या वाढीसह ८२,२०० च्या स्तरावर बंद झाला. त्याच वेळी, निफ्टी ५० ने सोमवारी २४,९९९ च्या स्तरावर ओपनिंग दिली आणि दिवसाअखेर ०.४९ टक्क्यांच्या वाढीसह २५,०९० च्या स्तरावर क्लोजिंग दिली.

बीएसई मिडकॅप निर्देशांक देखील बेंचमार्क निर्देशांकप्रमाणेच ०.५५ टक्क्यांनी वाढून बंद झाला. मात्र, बीएसई स्मॉलकॅप निर्देशांकाने सपाट क्लोजिंग दिली.

या दरम्यान, बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल मागील सत्रातील ४५८.४ लाख कोटी रुपयांवरून वाढून ४६० लाख कोटी रुपये झाले. त्यामुळे गुंतवणूकदारांना एकाच दिवसात २ लाख कोटी रुपयांचा नफा झाला.

निफ्टी ५० मधील टॉप गेनर्सबद्दल सांगायचे झाल्यास, सर्वाधिक वाढ इटरनल या स्टॉकमध्ये झाली, ज्यामध्ये ५.६४ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर आयसीआयसीआय बँकेत २.८१ टक्क्यांची वाढ, एचडीएफसी बँकेत २.२१ टक्क्यांची वाढ, एचडीएफसी लाइफमध्ये १.७४ टक्क्यांची वाढ आणि महिंद्रा अँड महिंद्रामध्ये १.७१ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली.

तर निफ्टी ५० मधील टॉप लूझर्समध्ये सर्वात मोठा तोटा रिलायन्स इंडस्ट्रीजला झाला, ज्यामध्ये ३ टक्क्यांहून अधिक घसरण झाली. त्यानंतर विप्रोमध्ये २.४८ टक्क्यांची घसरण, इंडसइंड बँकेत १.३ टक्क्यांची वाढ, आयशर मोटर्समध्ये १.२४ टक्क्यांची वाढ

**सेन्सेक्स 82,200**

**निफ्टी 25,090**

आणि एचसीएलटेकमध्ये १.१९ टक्क्यांची वाढ नोंदली गेली.

जरी बहुतांश सेक्टोरल निर्देशांक हिरव्या चिन्हावर बंद झाले असले तरी काही सेक्टरना तोट्याचा सामना करावा लागला. यामध्ये ऑइल अँड गॅस सेक्टरला सर्वाधिक फटका बसला, ज्यामध्ये १ टक्क्यांहून अधिक घसरण झाली. त्यानंतर निफ्टी पीएसयू बँकेत ०.६२ टक्क्यांची घसरण, निफ्टी एफएमसीजीमध्ये ०.५ टक्क्यांची घसरण आणि निफ्टी आयटीमध्ये ०.३ टक्क्यांची घसरण झाली.

सर्वाधिक फायदा निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेसला झाला, ज्यामध्ये १.६२ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर निफ्टी प्रायव्हेट बँकेत १.२६ टक्क्यांची वाढ, निफ्टी बँकेत १.१९ टक्क्यांची वाढ, निफ्टी कॅपिटल मार्केटमध्ये १.१८ टक्क्यांची वाढ, निफ्टी सर्व्हिसेस सेक्टरमध्ये १.०८ टक्क्यांची वाढ आणि निफ्टी मेटलमध्ये १.०८ टक्क्यांची वाढ झाली.

# बांगलादेशच्या हवाई दलाचे विमान शाळेवर कोसळले, १९ ठार

**ढाका, दि. २१ वृत्तसंस्था**

बांगलागदेश हवाई दालचे एक प्रक्षिक्षणासाठी वापरले जाणारे विमान सोमवारी राजधानी ढाका येथील शाळेवर कोसळल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत १९ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी असल्याचे सांगितले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चीनी बनावटीचे एफ-७ हे विमान ढाकाच्या उत्तरा भागातील माइलस्टोन स्कूल अँड कॉलेज इमारतीवर कोसळले.

या दुर्घटनेनंतर सोशल मीडियावर यासंबंधीचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहेत. तसेच स्थानिक वृत्तवाहिन्यांकडून दाखवण्यात येत असलेल्या फुटेजनुसार, अपघातस्थळी आगीचे लोट आणि काळा धूर पाहायला मिळाला. दरम्यान बचाव पथकांकडून जखमींना रुग्णालयात दाखल केले जात आहे.

बांगलादेशच्या उत्तर उत्तरा भागात झालेल्या अपघाताच्या वेळी माइलस्टोन स्कूल अँड कॉलेजमध्ये मुले उपस्थित होती, अशी माहिती देखील समोर आली आहे.



जखमी विद्यार्थ्यांना बचावासाठी लष्कराचे पथक आणि अग्निशमन दलाचे कर्मचारीही तैनात करण्यात आले आहेत. दरम्यान स्थानिक माध्यमांना प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, विमान हे माइलस्टोन कॉलेजच्या कॅन्टीनवर दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास कोसळले.

# केरळमध्ये अडकलेले एफ-35 दुरुस्त झाले

**कोची, दि. २१ वृत्तसंस्था**

अमेरिकन बनावटीचे ब्रिटिशांच्या मालकीचे आणि भारतीय हवाई दलाने ट्रॅक केलेले स्टील्थ लढाऊ विमान F-35B हे दुरुस्त झाले आहे. या महागड्या विमानाचे तंत्रज्ञान लीक होईल म्हणून ब्रिटिशांना एवढी धास्ती होती की त्यांनी ते विमान फुकटचे देऊ केलेल्या एअर इंडियाच्या हँगरमध्ये देखील नेले नव्हते. भारतीय हवाई दलाने हवी नको ती मदत केली होती. परंतू, हे विमान काही केल्या उडू शकत नव्हते. अखेर पाच आठवड्यांनी या विमानाची दुरुस्ती झाली असून उद्या ते भारत सोडणार आहे.



ब्रिटिश रॉयल नेव्हीच्या विमानवाहू नौकेवर तैनात असलेले हे लढाऊ विमान तांत्रिक बिघाडामुळे केरळच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन परिस्थितीत उतरविण्यात आले होते. ब्रिटिशांनी या विमानासाठी भारतीय हवाई दलाकडे परवानगी मागितली होती. त्यांना वाटले होते की आपले विमान हे स्टील्थ म्हणजेच कोणत्याही रडारला पकडता येणार नाही असे आहे. यामुळे भारताला याची कल्पना नसेल. परंतू, भारतीय हवाई दलाने हे विमान आधीच ट्रॅक केलेले होते.

मदत म्हणून भारताने या विमानाला केरळच्या विमानतळावर उतरण्यास परवानगी दिली होती. उतरल्यानंतर इंधनही भरले होते, परंतू या विमानाची हायड्रॉलिक सिस्टीम नादुरुस्त झाली होती. तिकडे समुद्रात ३०० नॉटीकल मैलांवर ब्रिटिशांची युद्धनौका विमानाची वाट पाहत उभी होती. भारताने विमान दुरुस्तीची ऑफरही दिली होती, परंतू ब्रिटिशांनी ती नाकारली होती. अखेरीस हे विमान दुरुस्त होत नसल्याने ब्रिटनहून तज्ञांची टीम पाठविण्यात आली होती. जर दुरुस्त झालेच नाही तर विमान डिसमेंटल करून ब्रिटनला मालवाहू विमानात भरून नेण्यात येणार होते.

परंतु, अखेरीस पाच आठवड्यांपासून एकाच जागी उभे असलेले हे लढाऊ विमान पुन्हा हवेत झेपावणार आहे. मंगळवारी या विमानाच्या उड्डाणासाठी परवानगी देण्यात आली आहे. आता हे विमान पुन्हा आपल्या युद्धनौकेवर परतणार की ब्रिटनकडे जाणार हे स्पष्ट झालेले नाही.

# 'ईडी'ने सर्व मर्यादा ओलांडल्या; हे असे चालू देऊ शकत नाही- सर्वोच्च न्यायलय

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**

"सक्तवसुली संचालनालय सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत, हे असं चालू देऊ शकत नाही," अशा कठोर शब्दांत आज सर्वोच्च न्यायालयाने ईडीला फटकारले. वकिलांनी त्यांच्या क्लायंटना दिलेल्या सल्ल्यांवरून त्यांना समन्स पाठवण्यात आल्याच्या प्रकरणावर सुनावणी करताना सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी हे तीव्र निरीक्षण नोंदवलं. सरन्यायाधीशांनी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता आणि ॲडिशनल सॉलिसिटर जनरल एस.व्ही. राजू यांना सुनावले आणि स्पष्टपणे सांगितले की, "आपल्याला काही मार्गदर्शक तत्वांची गरज आहे, हे असं चालू राहू शकत नाही. ईडीच्या अधिकाऱ्यांनी सर्व सीमा ओलांडल्या आहेत. याआधी दोन प्रकरणांतही आम्ही ॲडिशनल सॉलिसिटर जनरल राजूंना सांगितलं होतं की त्यांनी तोंड उघडू नये, नाहीतर आम्हाला काही तीव्र टिपण्णी करावी लागेल." ईडीने काही ज्येष्ठ वकिलांना केवळ त्यांनी त्यांच्या क्लायंटना दिलेल्या सल्ल्यावरून समन्स पाठवले होते. बार असोसिएशन्सनी यावर तीव्र आक्षेप नोंदवून सरन्यायाधीशांना पत्र लिहिले होते. या समन्समुळे न्यायव्यवस्थेची स्वायत्तता आणि वकिलांचा स्वतंत्रपणे काम करण्याचा हक्क धोक्यात येतो, असं या पत्रात नमूद करण्यात आलं. वरिष्ठ वकिल अरविंद दातार आणि प्रताप वेणुगोपाल यांना अलीकडे ईडीने समन्स पाठवले होते. नंतर ईडीने समन्स मागे घेतले आणि स्पष्टीकरण देत म्हटले की, "पुढील वेळी वकीलांना समन्स पाठवायचा झाल्यास केवळ ईडी संचालकाच्या मंजुरीनंतरच तो पाठवला जाईल."

# शिरसाट यांच्या घरावर हल्ल्याचा प्रयत्न

**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ प्रतिनिधी**


सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट गेल्या काही दिवसांपासून चांगलेच चर्चेत आहेत. छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी त्यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप केले आहेत. तसेच काही दिवसांपूर्वी त्यांचा एक व्हिडीओही व्हायरल झाला होता. या व्हिडीओमध्ये त्यांच्या बेडच्या बाजूला पैशांनी भरलेली एक बॅग दिसली होती. असे असतानाच आता त्यांच्या घरावर हल्ला झाल्याची मोठी घटना घडली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास हा प्रकार घडला आहे. मिळालेल्या माहितीनुसार छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या घरावर हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आलाय. मध्यरात्रीच्या ही घटना घडली आहे. मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास एका तरुणाने शिरसाट यांच्या घरावर दगडफेक केली आहे. तसेच त्याने शिरसाट यांच्या घराच्या परिसरात आरडाओरडही केली आहे. सौरभ घुले असे हल्ला करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाचं नाव आहे. प्राथमिक माहितीनुसार हल्ला करताना हा तरूण मद्यधुंद अवस्थेत होता. ही घटना समोर येताच या तरुणाविरोदात सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाची चौकशी करत आहेत. दरम्यान, शिरसाट गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळया कारणांमुळे चर्चेत आहेत. नुकतेच त्यांचा एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. या व्हिडीओत ते एका बेडवर बसूनसिगारेट ओढताना दिसत होते. तर त्यांच्या बाजूला एक कुत्राही होता. विशेष म्हणजे याच व्हिडीओमध्ये त्यांच्या खोलीत कथितरित्या पैशांनी भरलेली एक बॅगही दाखवण्यात आली होती. हा व्हिडीओ समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली होती. एवढी सारी रोकड आलीच कुठून असा सवाल उपस्थित केला जात होता.

# डोळ्यांचे विकार आणि उपचार

मानवी शरीराचा सर्वात नाजूक अवयव म्हणजे आपले डोळे.याच डोळयांनी आपण साऱ्या सृष्टीचं दर्शन घेतो. किंबहुना मनुष्य डोळस असेल तरच त्याच जगणं सहजसाध्य असत,म्हणूनच आपले डोळे हे आपला अनमोल असा ठेवा आहेत. परंतु अनेकदा काही कारणांमुळे डोळयांचे आजार उद्भवतात. अनेकांना दूरच किंवा जवळच न दिसू लागल्याने डोळयावर चष्मा देखील लागतो. काहींचे डोळे अकाली अंधुक होतात किंवा डोळयांमध्ये तिरळेपणा येतो. मुळातच डोळयांचे हे आजार नेमके कोणते असतात?आणि आपल्या डोळयांची काळजी नेमकी कशी घ्यायला हवी?डोळयांच्या आजारावर उपचार कोणते आहेत? **यासंदर्भात नेत्रविकार तज्ञ डॉ.अभिजित भोंजाळ यांच्याशी साधलेला संवाद.**

१]डोळयांचे आरोग्य जपायचे म्हणजे नेमकं काय?

डोळयांच्या आरोग्याच्या बाबतीत अनेक लोकांचा गैरसमज हा असतो कि डोळयांमध्ये गुलाबपाणी टाकले किंवा एखादे औषध टाकले कि आपण डोळयांची योग्य काळजी घेतो. परंतु हे चुकीचे आहे.आपल्या सभोवताली जे वातावरण आहे ते प्रदूषित आहे. याच वातावरणातील घाण डोळयात जाऊ नये म्हणून रोज सकाळ संध्याकाळ आपले डोळे हे थंड पाण्याने धुवायला हवेत. आपले डोळे हे चष्मावाल्याकडे नव्हे तर डोळयांच्या डॉक्टारांकडे जाऊन वेळच्यावेळी तपासायला हवेत.



तसेच आपल्या डोळयांच्या सुधृढ आरोग्यासाठी आपल्या आहारात अ जीवनसत्वाची अत्यंत आवश्यकता असते. हे अ जीवनसत्व आपल्याला गाजर,पपई आणि हिरव्या पालेभाज्यांमधून मिळत म्हणूनच आपल्या आहारात या पालेभाजा आणि गाजर व पपईचा समावेश असायला हवा. यामुळेच डोळयांचं आरोग्य हे सुधृढ राहत.

२]लहान मुलांच्या बाबतीत

**हॅलो डॉक्टर**

डोळयांची काळजी नेमकी कशी घ्यायला हवी?

लहान मुलं जेंव्हा जन्माला येत त्यानंतर साधारणपणे ३ दिवसानंतर त्याला दिसायला लागत. हळूहळू रंगांची ओळख देखील होऊ लागते. पहिल्या ३ महिन्यात जर मुलाला अंधत्व असेल असं कळलं तर वेळीच उपचार सुरु करायला हवेत त्याच्या डोळयांची तपासणी करणे गरजेचं असत. शिवाय मुलाच्या डोळयांना दुखापत होऊ नये म्हणून देखील पालकांनी जपायला हवं. लहान

**लोकारोग्य**

मुलांना चष्मा फार लवकर लागतो त्यांच्या डोळयांमध्ये तिरळेपणा येतो अनेकदा जन्मतः मुलाला काही आजार असतात त्याचा देखील डोळयांवर परिणाम होतो.लहान मुलांना ६ वर्षापर्यंत मोबाईल हातात देऊ नये कारण मोबाईलचा प्रकाश डोळयात गेल्याने डोळयाची बाहुली आकुंचन पावते हे फार घातक असत. याशिवाय डोळयात काजळ घालणे,सुरमा घालणे असे अघोरी प्रकार करू नयेत त्यामुळे डोळयांना इजा पोहचू शकते.

३] डोळयांची खूप जळजळ होणे,काम करताना झोप आल्यासारखे वाटणे यावर उपचार काय?

आपल्या डोळयात जर कोरडेपणा असेल तर अचानक डोळे लाल झाल्यासारखे वाटतात आणि डोळयांना थकवा आल्याने डोळे जळजळतात. याकरिता मेडिकल मध्ये आर्टिफिशिअल टियर्स किंवा रिफ्रेश टियर्स यासारखी औषध मिळतात हे औषध सकाळ दुपार संध्याकाळ डोळयांमध्ये घालावं आणि सकाळ संध्याकाळ डोळे थंड पाण्याने धुवावेत व डोळयांना आराम द्यावा.

४]काम्पुटरचा किंवा मोबाईलचा डोळयावर थेट दुष्परिणाम होतो का?

हल्लीच युग कम्युटर चे असल्याने कम्युटर वर काम करणे अपरिहार्य आहे. परंतु आपण कम्युटर समोर बसताना कम्युटर आपल्या डोळयांपेक्षा २ ते ३ इंच खाली असेल असं बसावं जेणेकरून आपल्या डोळयांच्या भोवती जे पापण्यांचे आवरण असते त्यावर ताण पडत नाही. कम्युटर समोर सलग बसून काम न करता मध्ये ५ मिनिट ब्रेक घेऊन फिरून यावं आणि नंतर काम करावं. सतत कम्युटर समोर बसून काम केल्याने आपल्या डोळयांची बाहुली आकुंचन पावते त्यासाठी आपल्या डोळयावर दोन्ही हात ठेऊन १ मिनिट दाबून धरावेत त्यामुळे डोळयाची बाहुली प्रसरण पावते. शिवाय डोळयांमध्ये आर्टिफिशील टियर्स टाकावेत मोबाईल वापरताना तो लाईट मध्ये वापरावा ज्यामुळे डोळयांना ताण पडणार नाही लाईट बंद करून अंधारात मोबाईल वापरल्याने मोबाईलचे लाईट थेट डोळयात जाऊन डोळयांना इजा पोहचते . यासाठी कम्युटर समोर बसताना कम्युटरच्या पाठच्या बाजूला लाईट लावून काम करावं. त्यामुळे लाईट थेट आपल्या डोळयांमध्ये जात नाही.


५]डोळयावर लागलेला चष्मा कालांतराने जातो का ?त्यासाठी उपचार काय आहेत?

डोळयावर चष्मा लागल्यानंतर अनेकजण नंबर कमी व्हावा आणि चष्मा कायमचा जावा याकरिता आयुर्वेदिक औषध घेत असतात परंतु हे चुकीचे आहे आपल्या डोळयांची लांबी वाढल्याने किंवा बुबुळ वाकडीतिकडी झाल्याने चष्म्याचा नंबर लागतो जो कोणत्याही आयुर्वेदिक औषधाने जात नाही. मात्र लेसर किरणने शस्त्रक्रिया करून चष्मा काढून टाकता येतो.

# कुपोषित घटकांसाठी कार्यरत निरामय फाउंडेशनची रौप्य महोत्सवी वाटचाल

महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील आणि आदिवासी पाड्यातील कुपोषित माता आणि मुलांच्या विकासासाठी त्यांच्या निरामय आरोग्यासाठी काम करण्याच्या उद्देशाने 25 वर्षापूर्वी डॉ.जानकी देसाई यांनी ज्या निरामय हेल्थ फाऊंडेशनचे य सामाजिक संस्थेची स्थापना केली होती त्याच निरामय हेल्थ फाऊंडेशन ची रौप्य महोत्सवी वाटचाल सध्या सुरू झाली असून हेच औचित्य साधून निरामया हेल्थ फाउंडेशनने मुंबईत माटुंगा येथे पायनियर हॉलमध्ये एनजीओ मीटचे आयोजन केले होते. या अर्धदिवसीय कार्यक्रमामध्ये मुंबई तसेच आजूबाजूच्या शहरांतील ४० हून अधिक स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या. या कार्यक्रमाचा उद्देश जीवनचक्राच्या विविध टप्प्यांवर आहाराचा आरोग्य आणि एकूण कल्याणावर होणारा परिणाम, एनजीओंना भेडसावणाऱ्या सामान्य अडचणी, शाश्वत विकासासाठी शासन आणि एनजीओ यांच्यातील भागीदारीच्या रणनीती, तसेच क्षयरोगावरील (TB) नवीन हस्तक्षेप यावर चर्चा करणे हा होता.

कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून श्री डॉ. दक्षा शाह (कार्यकारी आरोग्य अधिकारी, महापालिका)



**जनआरोग्य**

उपस्थित होते. यावेळी मान्यवर वक्त्यांमध्ये डॉ. प्रसन्ना पाटील (सावित्रीबाई फुले एकात्म समाज मंडळ, संभाजीनगर), डॉ. नेहा नलवडे (डब्ल्यूएचओ सल्लागार), डॉ. अल्का जाधव (बालरोगतज्ज्ञ), डॉ. सफला श्रॉफ (स्त्रीरोगतज्ज्ञ), डॉ. विनया वैशंपायन (प्रमुख, बीएमएन महाविद्यालय) आणि डॉ. वीणा यार्डी (पोषणतज्ज्ञ) यांचा समावेश होता. त्यांनी आपले अनुभव आणि अभ्याससिद्ध माहिती सहभागी संस्थांसोबत शेअर केली.निरामया हेल्थ फाउंडेशनच्या मानद संचालिका सौ. शुभलक्ष्मी पटवर्धन यांनी संस्थेच्या २५ वर्षांच्या उल्लेखनीय कार्ययात्रेची माहिती दिली आणि समाजातील वंचित घटकांसाठी आरोग्य व पोषण क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा घेतला.यावेळी बोलताना शुभलक्ष्मी मॅडम म्हणाल्या,

"मुंबई सारख्या झोपडपट्ट्या मध्ये तसेच ग्रामीण आणि आदिवासी पाड्यांमध्ये कुपोषणाची समस्या ही आजही तीव्र असून अनेक माता आणि बालकांचा मृत्यू कुपोषणामुळे होतो हे दुर्दैव आहे.अशा कुपोषित घटकांना संस्थेच्या माध्यमातून कोरडा शिधा पुरविण्याचे काम अविरतपणे सुरू असून अशा कुपोषित महिला, तरुणी, मूल यांचे आरोग्य आणि आहारा संदर्भात समुपदेशन देखील संस्था करते.अशा घटकांना कुपोषणावर मात करण्यासाठी आवश्यक त्या सप्लिमेन्ट्री औषधांचा पुरवठा संस्था करतेच शिवाय अशा कुपोषित माता आणि बालकांच्या आरोग्याची तपासणी फिरत्या दवाखान्याच्या माध्यमांतून अगदी त्यांच्या घरापर्यंत जाऊन करण्याचे काम देखील संस्था करते.समाज कुपोषण मुक्त करण्यासाठी सामाजिक संस्था आणि सरकार अशा दोन्ही माध्यमातून काम होणे गरजेचे आहे"

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# चीनने ब्रह्मपुत्रा नदीवर सर्वात मोठे धरण बांधण्यास केली सुरुवात

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**

चीन जगातील सर्वात मोठे धरण बांधण्यास सुरुवात करत आहे. हे धरण ब्रह्मपुत्र नदीवर बांधण्यात येणार आहे. या धरणाचे नाव यारलुंग झांगबो आहे. हे धरण बांधण्यासाठी १६७.८ अब्ज अमेरिकन डॉलर्स म्हणजेच १ लाख ४४ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत. पण, हे धरण बांधायला सुरुवात करण्याआधीच भारताने आक्षेप घेतला आहे.

अरुणाचल प्रदेशच्या सीमेजवळच हे धरण होणार आहे. यामुळे खालील गावांना याचा फटका बसू शकतो. खाली असणाऱ्या गावांना पुराचा धोका होऊ शकतो. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने या धरणावर आक्षेप घेतला आहे. भारताने चीनला ब्रह्मपुत्रेवर असे कोणतेही काम करू नये असे सांगितले होते, यामुळे खालच्या भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे नुकसान होईल. त्यानंतर चीनची बाजूही समोर आली. चीनने म्हटले होते की, या प्रकल्पामुळे खालच्या भागातील देशांचे कोणतेही नुकसान होणार नाही. ते या धरणाबद्दल इतर देशांशी चर्चा करत राहतील. यापूर्वी १८ डिसेंबर २०२४ रोजी एनएसए अजित डोभाल आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्यात पाण्याबाबत चर्चा झाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, चीन एक जलविद्युत प्रकल्प बांधत आहे. त्याची पायाभरणी चीनचे पंतप्रधान ली कियांग यांनी शनिवारी, १९ जुलै रोजी केली. अरुणाचल प्रदेशजवळील तिबेटमधील न्यिंगची शहरात हे धरण बांधले जाणार आहे. तिथे ब्रह्मपुत्र नदी एक मोठा यू-टर्न घेते आणि अरुणाचल प्रदेशमार्गे बांगलादेशला जाते. या जलविद्युत प्रकल्पात पाच कॅस्केड पॉवर स्टेशन असतील. यामुळे दरवर्षी ३०० अब्ज किलोवॅट-तासांपेक्षा जास्त वीज निर्मिती होईल. दरवर्षी ३० कोटी लोकांना वीज पुरवली जाईल. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली होती. त्यावर बांधकाम सुरू झाले आहे.

# ऑपरेशन अस्मितातून उघडकीस आले धर्मांतर रॅकेट, १० जणांना अटक

**आग्रा, दि. २१ वृत्तसंस्था**

छंगूर बाबा उर्फ जलालुद्दीन रॅकेटनंतर, उत्तर प्रदेश पोलिसांनी बेकायदेशीर धर्मांतराचे एक मोठे नेटवर्क उघडकीस आणले आहे. यासाठी “ऑपरेशन अस्मिता” अंतर्गत ६ राज्यांमधून १० जणांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांचे म्हणणे आहे की, या नेटवर्कमध्ये सहभागी असलेले लोक लव्ह जिहादद्वारे धर्मांतर करायचे, परदेशातून निधी मिळवायचे आणि धर्मांधता पसरवायचे, जी दहशतवादी संघटना आयसिसची सिग्नेचर शैली आहे. या नेटवर्कचे बंदी घातलेल्या संघटना पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया, सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया आणि पाकिस्तानच्या दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याचेही संकेत मिळाले आहेत.

या वर्षी मार्चमध्ये आग्राच्या सदर बाजार पोलीस ठाण्यात दोन सख्व्या बहिणी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यांचे वय ३३ वर्षे आणि १८ वर्षे असे आहे. त्यानंतर पोलिसांनी बेकायदेशीर धर्मांतर कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. पोलिसांनी तपास केला तेव्हा हे प्रकरण एका मोठ्या नेटवर्कशी संबंधित असल्याचे आढळले. त्यानंतर प्रकरण सायबर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आले आणि सखोल तपास सुरू करण्यात आला.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, या नेटवर्कने इस्लामिक उपदेश, यूट्यूब चॅनेल आणि गुप्त ऑनलाइन सत्रांच्या माध्यमातून हिंदू मुलींचे ब्रेनवॉश करण्यासाठी स्थानिक एजंट्सची नेमणूक केली होती. अधिकाऱ्यांनी सांगितले की, मुलींना विविध आमिषे दाखवून त्यांना कट्टरपंथी बनवण्यात आले आणि नंतर बनावट ओळखपत्रांचा वापर करून त्यांची वेगवेगळया राज्यांत तस्करी करण्यात आली

# २० रुपयांसाठी जन्मदात्या आईची केली हत्या

**नूह, दि. २१ वृत्तसंस्था**

वीस रुपये देण्यास नकार दिला म्हणून एका मुलानं आपल्या जन्मादात्या आईची डोक्यात कुऱ्हाड घालून हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हरियाणाच्या नूह जिल्ह्यातील जयसिंगपूर गावात हा प्रकार घडला आहे. ही घटना उघड झाल्यानंतर आसपासच्या गावकऱ्यांना मोठा धक्का बसला असून हळहळ व्यक्त केली जात आहे. आरोपी मुलाला अंमली पदार्थांचे व्यसन होते, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी या प्रकरणात आरोपी मुलाला अटक केली आहे. सदर आरोपीविरोधात हरियाणा पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे.

# मुस्लीम पुरुषाचा हिंदू महिलेशी निकाह

## दोघांना विभक्त करण्याचा पंचायतीचा निकाल

**चंडीगड, दि. २१ वृत्तसंस्था**

हरियाणातील चरखी दादरी जिल्ह्यातील पटुवास या गावात रविवारी (२० जुलै) पंचायत भरवण्यात आली होती. या पंचायतीने एका अंतरधर्मीय विवाहित जोडप्याला (मुस्लीम तरुण व हिंदू तरुणी) विभक्त करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच मुस्लीम तरुणाच्या कुटुंबावर तीन गावांमध्ये बहिष्कार घालण्याची घोषणा केली आहे.

चरखी दादरी जिल्ह्यातील महाराणा, खेरी संवल व पटुवास या तीन गावातील रहिवासी या पंचायतीला म्हणजेच बैठकीला उपस्थित होते. शाहिद हा मुस्लीम तरुण व प्रीती नावाच्या हिंदू तरुणीच्या निकाहमुळेळ तिन्ही



गावांमध्ये निर्माण झालेल्या तणावावर या बैठकीत सलग चार तास चर्चा झाली. या चर्चेअंती पंचायतीने सदर अंतरधर्मीय जोडप्याला विभक्त करण्याचे आदेश दिले.

कपूरसिंग व धरमपाल हे पटुवास गावाचे प्रमुख (सरपंच) या पंचायतीच्या बैठकीचे अध्यक्ष होते. या बैठकीत आदेश देण्यात आला की शाहिदने आता त्याच्या गावी परत येऊ नये. यावर त्याचे आजोब सहमत असल्याची माहिती धरमपाल यांनी पंचायतीला दिली. दरम्यान, पंचायतीने शाहिदच्या कुटुंबाशी कोणतेही सामाजिक संबंध न ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, या प्रकरणाविषयी धरमपाल म्हणाले, “विभक्त होण्याची प्रक्रिया आधीच सुरू केली आहे. ३ जुलै रोजी शाहिद व प्रीती यांचा निकाह (इस्लामिक विवाह सोहळा) पार पडला होता. ६ जुलै रोजी ग्रामस्थांना या निकाहची माहिती मिळाली. तेव्हापासून गावात वाद सुरू झाला. परिणामी गावात तणावाचं वातावरण निर्माण झालं. लोकांनी याविरोधात निदर्शने केली. तसेच गावांमधील मुस्लिमांची दुकान जबरदस्तीने बंद केली.

महासागर PALGHAR
RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, **Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK, Executive Editor- Shashi Karpe**

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक : **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) कार्यकारी संपादक - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com**
RNI No.: MAHAMAR/2014/62313